रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ११२ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## ट्रकची कारला धडक

**तळोजा :** भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने कारला धडक दिल्याने कारचे नुकसान झाले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंकज कुमार यांच्यासोबत अभिजीत देशवंडीकर हे १८ सप्टेंबर रोजी होंडा सिटी कारने कंपनीच्या कामासाठी तुर्भे येथून रसायनी येथे जात होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास सोमाटणे फाटा या ठिकाणी आले असता एका ट्रकने कारला पाठीमागून जोरात धडक दिल्याने कारचे नुकसान झाले. ट्रक चालकाचे नाव राजेश कुमार हरिजन (रा. जासई-उरण) असे आहे. याप्रकरणी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड, शुक्रवार, दि. २० सप्टेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## रमित खट्टर काँग्रेसमध्ये

**चंदीगड :** हरियाणाच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या असून, मतदानासाठी १५ दिवसांचा कालावधी बाकी आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान ५ ऑक्टोबरला होणार आहे. या निवडणुकीपूर्वी भाजपला मोठा धक्का बसला आहे. भाजप नेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांचे पुतणे रमित खट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. हरियाणा युवक काँग्रेसनं रमित खट्टर यांच्या प्रवेशाच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. रोहतक येथील आमदार भारत भूषण बत्रा यांच्या उपस्थितीमध्ये रमित खट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. भाजपासाठी हा मोठा धक्का असल्याचे बोलले जाते.

Unlock your Digital Curiosity
Learn Basic to Advanced Digital Skills!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by AI-ML
mscit.mkcl.org
प्रवेशाची अंतिम तारीख: २५ सप्टेंबर २०२४
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

**आजचा अग्रलेख**

**मोदींचे नवे खेळणे**

# लढवय्या नेता हरपल्याने मोठी हानी

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सीताराम येचुरी यांच्यासारखा लढवय्या नेता हरपल्याने डाव्या विचारांच्या चळवळीची फार मोठी हानी झाली आहे, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

शेकापच्यावतीने शेकाप भवन येथील सभागृहात कॉ. सीताराम येचुरी यांची श्रध्दांजली सभा गुरुवारी (दि.१९) आयोजित करण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते.

### अलिबागमध्ये कॉ. सीताराम येचुरी यांना श्रद्धांजली



• (छायाचित्र : समीर मालोदे)

> डाव्या आघाडीचे स्फूर्तीस्थान अलिबाग होते. ते पुढे नेण्याचे काम नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील यांनी केले. त्यांचे काम आपण सर्वांनी अधिक जोमाने करण्याची गरज आहे. देशात सध्या वेगळ्या पद्धतीने राजकारण सुरु आहे. येचुरी यांच्या निधनामुळे देशातील कष्टकरी, कामगार, डाव्या चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आहे. एक चांगला मित्र, गोरगरीबांसाठी लढणारा नेता गेल्याने मोठी हानी झाली असून, त्यांची आठवण कायमच स्मरणात राहील, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, कॉ. सीताराम येचुरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. येचुरी हे एका उच्च शिक्षित अधिकाऱ्यांचे सुपुत्र होते. तेसुद्धा चांगले अधिकारी बनले असते. परंतु, विद्यार्थी दशेपासूनच गोरगरीब, पीडित, अन्यायग्रस्तांसाठी काम करण्याचा त्यांचा ध्यास होता. अन्यायाविरोधात उभे राहून शेतकरी, कामगार, कष्टकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी काम केले आहे. रायगड जिल्ह्यातील सेझ विरोधातील लढ्यामध्ये लाखो शेतकऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे. त्यांचे अलिबागसोबत एक वेगळे नाते होते, असे जयंत पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी शेकापचे ज्येष्ठ नेते प्रा. एस.व्ही. जाधव, शेकाप महिला राज्य आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, पान २ वर

**वे|ध|क**

### भुयारी मार्ग २० सप्टेंबरपासून बंद

**पोलादपूर :** मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी दोन भुयारी मार्गांपैकी नव्याने वाहतुकीस एक मार्ग सुरू केला. मात्र, भुयारातील अंतर्गत कामे पूर्ण करण्यासाठी येत्या २० सप्टेंबरपासून नवीन भुयारी मार्गातील वाहतूक बंद करण्यात येणार आहे. हा भुयारी मार्ग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महामार्ग पाहणी दौऱ्यानंतर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ सप्टेंबरपासून वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. गेल्यावर्षी गणेशोत्सव काळात एका भुयारी मार्गातून हलकी प्रवासी वाहने सोडण्यात आली होती; पान २ वर

### सदावर्तेंची एसटी बँकेची सभा उधळली

**भंडारा :** ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनेलकडून बोलावण्यात आलेली भंडाऱ्यातील एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा चांगलीच वादळी ठरली. प्रचंड गदारोळानंतर ही सभा संपली. या सभेमध्ये पोलिसांवर खुर्च्या फेकण्यात आल्या आणि एकमेकांना धक्काबुक्की झाली. ॲड. सदावर्तेंवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा ठराव विरोधकांनी मांडला. तर, मारहाणप्रकरणी सदावर्तेंच्या समर्थकांची भंडारा पोलिसात तक्रार दाखल केली. एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांच्या एसटी ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेची सर्वसाधारण ७१ वी सभा आयोजित केली होती.

## आ. गोगावले यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर बोळवण?

# दुधाची तहान ताकावर

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**शिंदे गटात सुरुवातीपासून महाडचे आमदार भरत गोगावले यांना मंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी कोठेना कोठे माशी शिंकत असल्याने त्यांना मंत्रिपदाने हुलकावणी दिली. आता मात्र, त्यांना एसटी महामंडळाचे अध्यक्षपद देऊन त्यांची बोळवण करण्यात येणार असल्याचे दिसत. तसे झाल्यास काही घटिकांपुरतेच ते या पदावर राहण्याची शक्यता आहे. कारण, निवडणुका जाहीर होताच त्यांना या पदावरुन पायउतार व्हावे लागणार आहे. तूर्तास त्यांच्या नवीन कोटाची घडी मोडण्याची संधी त्यानिमित्ताने त्यांना मिळणार असल्याचे बोलले जाते. आमदार गोगावले हे कॅबिनेट दर्जाचे पद स्वीकारणार की सोडणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

### कोटाची घडी मोडणार

**गोगावले यांना सुरुवातीपासूनच मंत्रीपद मिळण्याची खात्री असल्याने त्यांनी शपथविधीसाठी खास कोट शिवून घेतला होता. मात्र, त्यांना वेळोवेळी मंत्रीपद न मिळाल्याने तो कोट तसाच पडून आहे. आता मंत्रीपद नाही, पण किमान एसटी महामंडळाचे अध्यक्षपद मिळणार असल्याने भरत गोगावले यांच्या कोटाची घडी मोडणार, अशी राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.**



शिंदे गटातील तीन आमदारांची नुकतीच महामंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी लागली होती. त्यामध्ये आनंदराव अडसूळ, हेमंत पाटील आणि संजय शिरसाटांच्या नावाचा समावेश आहे. टप्प्या-टप्प्याने एकनाथ शिंदेंकडून करण्यात येत असलेल्या महामंडळांच्या नियुक्त्यांवरून अजित पवार गटात त्यामुळे नाराजी निर्माण झाली आहे. सध्या सत्तेत केवळ एकाच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना महामंडळ तसेच मंत्रीपदाचे वाटप होत असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांमध्ये आणि पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पद मिळत असल्याने गोगावले हे पद स्वीकारणार का ? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. एसटी महामंडळाचे पद हे कॅबिनेट दर्जाचे आहे. गोगावले यांनी यापूर्वीच सत्तांतरानंतर अनेकदा मंत्रीपद मिळण्याबाबत आपली इच्छा बोलून दाखवली होती. मात्र, आता त्यांची बोळवण एसटी महामंडळावर केली जात असल्याचे दिसून येते. भरत गोगावले यांचे मंत्रीपद विरोधकांच्या टिंगलटवाळीचा विषय झाला होता. भरत गोगावले यांना मंत्रीपद मिळण्याची खात्री असल्याने त्यांनी शपथविधीसाठी खास कोट शिवून घेतला होता. मात्र, त्यांना मंत्रीपद न मिळाल्याने तो कोट तसाच पडून आहे, अशा शब्दांत विरोधकांनी गोगावले यांना अनेकदा खिजवले होते. आता मात्र, मंत्रीपद नाही, पण किमान एसटी महामंडळाचे अध्यक्षपद मिळणार असल्याने भरत गोगावले यांच्या कोटाची घडी मोडणार, अशी चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून भाजपसोबत राजकीय संसार थाटल्यानंतर त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या नेत्यांमध्ये भरत गोगावले आणि संजय शिरसाट यांचा समावेश आहे. भरत गोगावले यांनी अनेकदा आक्रमकपणे पक्षाची बाजू मांडली होती. ठाकरे गटाच्या नेत्यांनाही प्रत्युत्तर देण्याचे कामही ते सातत्याने करत असतात. त्यामुळे भरत गोगावले हे मंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. पहिल्या कॅबिनेट पान २ वर

## अजित पवार गटाला

# जोरदार धक्का

### ओबीसी सेलचा बडा नेता पवार काकांच्या गळाला



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ओबीसी सेलचे राज्य समन्वयक आणि प्रदेश सरचिटणीस ईश्वर बाळबुद्धे यांनी पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर आता पुन्हा एकदा शरद पवारांकडे परतण्याचा निर्णय घेतला आहे. ईश्वर बाळबुद्धे यांची घरवापसी होणार आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला काही दिवसांपूर्वीच राम-राम केला होता.

ईश्वर बाळबुद्धे यांचा शरद पवार यांच्या उपस्थितीत शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होणार आहे. ११ वाजता पक्ष कार्यालयात हा कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील माजी मंत्री अनिल देशमुख उपस्थित राहणार आहेत. ईश्वर बाळबुद्धे यांनी अनेक वर्ष ओबीसी चळवळीत काम केले आहे. आगामी निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार गटाला शरद पवार गटाने चांगलाच धक्का दिल्याचे बोलले जाते. बाळबुध्दे हे छगन भुजबळ यांचे समर्थक आणि ओबीसी सेलचे अध्यक्ष होते. ओबीसींना न्याय मिळत नसल्याची भावना घेऊन ओबीसी पदाधिकारी पवारांच्या गटात परतणार असल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडलेली असताना ईश्वर बाळबुद्धे राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष होते. ईश्वर बाळबुद्धे यांनी राज्यभरात यात्रा काढली होती. मागील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या ओबीसी सेलचा मोठा वाटा होता. ईश्वर बाळबुद्धे प्रत्येक मतदारसंघात जाऊन प्रचार करत होते. ओबीसी सेलच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण शिबिर नागपूर येथे ईश्वर बाळबुधे यांच्या नेतृत्वात घेण्यात आलं होतं. महाविकास आघाडीचे सरकार असताना ओबीसी महामंडळाच्या अध्यक्षपदी बाळबुद्धे यांची नियुक्ती करण्यात आली होती. पान २ वर

# शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा

### दोन कोटी १७ लाख ३४ हजार रुपयांच्या निधीची आवश्यकता

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

**जुलै व ऑगस्टमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाला अहवाल पाठविण्यात आला आहे, असे कृषी विभागातील सूत्रांनी सांगितले.**

जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे दोन हजार ३२४.२३ हेक्टर क्षेत्र बाधित होऊन सात हजार ८२४ शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला आहे. शासनाकडून नुकसान भरपाई तातडीने मिळण्याची आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, अजूनपर्यंत शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नसल्याची माहिती समोर येत आहे. शासनाकडून दोन कोटींहून अधिक रुपयांचा निधी आवश्यक असून, शेतकऱ्यांना भरपाईची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने जोरदार एन्ट्री मारली. ७ जुलैपासून सुरु झालेला पाऊस जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत म्हणजेच २६ जुलैपर्यंत सुरुच राहिला. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यातदेखील जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाली. पान २ वर

## वाचाळवीरांची दिल्लीत तक्रार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

गेल्या काही दिवसांमध्ये भाजपच्या कट्टर हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांकडून मुस्लीम समाजाविषयी करण्यात येत असलेल्या वक्तव्यांवर उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रचंड नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. मुस्लीमविरोधी वक्तव्यं करणाऱ्या या नेत्यांच्या भूमिकेचा फटका आगामी विधानसभा निवडणुकीत बसू शकतो. याची दखल घेत अजित पवार आता या भाजप नेत्यांविरोधात थेट दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे सत्तेतील घटक पक्षातील नेत्यांकडूनच भाजपाला ही चांगलीच चपराक असल्याचे बोलले जाते.

# पनवेल-सायन महामार्गावरील बॅनर वेधतोय लक्ष

**। पनवेल । वार्ताहर ।**

- **खिशात शिल्लक उरेना, आता करु खर्चावर चर्चा**
- **बॅनवर दिली अनोखी टॅग लाईन**

देशभरात सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत. वाढत्या महागाईचा फटका सर्वसामान्यांना अधिक बसत आहे. मात्र, केंद्र आणि राज्य सरकारला याच्याशी काही देणेघेणे नसल्याचे गेल्या काही वर्षात दिसून आले आहे. त्यातच आता पनवेल-सायन महामार्गावरील एक बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. 'खिशात शिल्लक उरेना, आता करु खर्चावर चर्चा' अशी टॅगलाईन असलेल्या बॅनवर उच्चांकी महागाईचा आलेख दर्शवण्यात आला आहे. सदरचा बॅनर कोणी लावला आहे. याची माहिती समोर आलेली नसली तरी हा बॅनर सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे.

दैनंदिन जीवनातील लागणाऱ्या विविध वस्तूंच्या वाढणाऱ्या किमतींनी सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक बजेट पुरते कोसळले आहे. कितीही मेहनत केली तरी घर कसे चालवायचे हे त्यांना सुचत नाही. जीएसटीचा अर्थ काय आहे, हे अजून सर्वसामान्य जनतेला तसेच मध्यम वर्गाला उमगलेला नाही. त्यातून समान्य माणसांचा खरंच फायदा झाला का, असे बोलके चित्र त्या माध्यमातून दिसत आहे.

सर्वसामान्य जनतेला काही घोषणा करून मोफत दिले त्याचा बोजा कोणावर पडतो. याचा विचार होणे गरजेचे आहे. पान २ वर

**दिल्लीमधून सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये फक्त घोषणांचाच पाऊस असल्याचे आता समोर आले आहे. सिलिंडरचा दर, पेट्रोल, डिझेल ते गहू, तांदूळ, ज्वारी, तेलाच्या किमतींनी २०२४ पर्यंत महागाईने उच्चांक गाठला आहे. या बॅनरच्या माध्यमातून किमती कशा वाढत गेल्या हे या बॅनरच्या माध्यमातून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.**




## इस्राईलनं पुकारलं नवं युद्ध

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इस्त्राईल आणि हमास यांच्यामध्ये गेल्या काही महिन्यांपासून संघर्ष सुरु आहे. लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहकडून वापरल्या जाणाऱ्या पेजरचे स्फोट झाल्यानं खळबळ उडाली आहे. मंगळवारी घडलेल्या घटनेनंतर बुधवारीही या स्फोटांची मालिका सुरु होती. त्यात २० जण ठार झाल्याची बातमी आहे. तीन हजारांहून अधिक जण जखमी झाले आहेत. लेबनॉनमधील चक्रावून टाकणाऱ्या या स्फोटानंतर ६० घरे १५ कार आणि डझनभर दुचाक्यांना आग लागली होती. अग्निश्मन दलाने आग विझवली. हिजबुल्लाहकडून वापरल्या जाणाऱ्या वॉकी टॉकीमध्ये देशातील दक्षिण भागात आणि राजधानीच्या दक्षिणेतील उपनगरांमध्ये स्फोट झाले आहेत.

## रोह्यात पाण्यातून अंत्ययात्रा; तातडीने पूल उभारण्याची ग्रामस्थांनी केली मागणी

# मृत्यूनंतरही मरणयातना संपेना

**। रोहा । वार्ताहर ।**

तालुक्यातील तळाघर ग्रामपंचायत हद्दीतील वैशाली नगर बौद्धवाडी येथे दोन दिवसांपूर्वी एका वयोवृद्धाचा मृत्यू झाला होता. स्मशानभूमी असणाऱ्या ठिकाणी जाण्यासाठी नदीवर पूल नाही. त्यामुळे वयोवृद्धाची अंत्ययात्रा गुडघाभर पाण्यातून नेण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. देश स्वतंत्र होऊ ७५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. मात्र, ग्रामीण भागांमध्ये अद्यापही अशीच भयावय स्थिती पाहायला मिळते. सरकार आणि प्रशासन नेमका कोणता विकास साधतात, हा खरा प्रश्न आहे.



वैशाली नगर येथील नागरिकांना पायाभूत सुविधा मिळत नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मृत्यूनंतर शेवटचा प्रवासदेखील सुखकर राहिलेला नाही. मृत्यू झालेल्या वयोवृद्धाच्या नातेवाईकांना या पाण्यातून वाट काढत मृतदेह अंत्यसंस्कारासाठी न्यावा लागला. त्यामुळे या वयोवृद्धाला शेवटचा प्रवास मरणयातना सहन करणारा ठरला. स्मशानात जाण्यासाठी रस्ता नसल्याने पावसाळ्यात खूप मोठ्या प्रमाणावर अडचण निर्माण होत आहे. तशी वैशाली नगर बौद्धवाडीची लोकवस्ती ५० ते ६० लोकसंख्या आहे. फक्त या वाडीचा राजकीय मंडळी मतांसाठी वापर करतात. मात्र, लोकांच्या गैरसोयींकडे लक्ष द्यायला वेळ नाही, हे दुर्दैव आहे. गेली अनेक वर्षे ग्रामपंचायतीकडे यासंदर्भात मागणी केली असता पान २ वर

> **वैशाली नगर तळाघर नागरिकांची मागणी योग्य आहे. परंतु, तेथील रस्ता व पूल वनविभागाच्या अखत्यारीत येत आहे. त्यांच्याकडून परवानगी मिळाली, तर ग्रामंचायतीचा १५ व्या वित्त आयोग, जिल्हा नियोजन समितीमार्फत करता येईल.**
> **– अर्चना पाटील,** ग्रामसेवक, तळाघर ग्रामपंचायत

## ट्रकचालकाला लुटणाऱ्या पाच दरोडेखोरांना अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवर ट्रकचालकाला लुटणाऱ्या पाच दरोडेखोरांना पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून पाच मोबाईल फोन आणि सात हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. रोहन उर्फ गुड्डू गोपीनाथ नाईक (२४), रोहिदास सुरेश पवार (२३), आतेश रोहिदास वाघमारे (२६), मनीष काळूराम वाघमारे (३५), शंकर चंदर वाघमारे (१८, सर्व राहणार निंबोडेवाडी, खालापूर) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांना न्यायालयात हजर केले असता २० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ट्रकवरील चालक गेंदलाल पटेल हा लघुशंकेसाठी पळस्पे हायवे पोलीस चौकीच्या २०० मीटर पुढे थांबला असताना चोरट्यांनी ९ सप्टेंबर रोजी त्याला हाताबुक्क्यांनी मारहाण करून धमकावले आणि मोबाईल आणि रोख रक्कम घेऊन पोबारा केला होता. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गीजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, विजय देवरे, सुनील कुदळे, महेश धुमाळ, शिवाजी बाबर, सतीश तांडेल, राजकुमार सोनकांबळे, आकाश भगत, भीमराव खताळ, वैभव शिंदे, प्रवीण पाटील यांनी या गुन्ह्यातील आठ आरोपींपैकी पाच आरोपींना अटक केली. या गुन्ह्यातील आणखी तीन आरोपींचा पान २ वर

## पान १ वरुन

## लढवय्या नेता हरपल्याने मोठी हानी



शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, राजेंद्र कोरडे, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, नागाव सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते तुकाराम पाटील, विजय गिदी, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद ठाकूर, जनार्दन पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना किर, अशोक प्रधान, अवधूत पाटील, अनिल पाटील, पुरोगामी अलिबाग तालुका युवक संघाचे अध्यक्ष तथा मुरूड तालुका संपर्क प्रतिनिधी विक्रांत वार्डे, सुरेश खोत आदी शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सीताराम येच्युरी यांनी जिल्ह्यातील वेगवेगळ्या लढ्यात, आंदोलनात अनेकवेळा मार्गदर्शन केले आहे. कोकण भवन येथे एक लाख शेतकऱ्यांच्या उपस्थितीत सेझविरोधात मोर्चा काढला होता. या मोर्चात सीताराम येच्युरी यांनी सर्वांना संबोधित केले होते. या लढ्याची दखल त्या वेळच्या सरकारला घ्यावी लागली होती. देशाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग असलेला येच्युरी यांच्या रुपाने देशाला चांगला नेता मिळाला होता. वैचारिक बांधिलकी जपणारे ते एक नेते होते. त्यांच्या सहवासात राहण्याची संधी मला अनेकवेळा बैठका, लढ्याच्या माध्यमातून मिळाली, असे पाटील यांनी सांगितले. गोरगरीबांचे कायदे अबाधित राहावेत, लोकशाही टिकावी यासाठी ते कायमच प्रयत्नशील राहिले. पंचायतीपासून संसदेपर्यंत अस्थिरता निर्माण होण्याचा धोका त्यांच्या लक्षात आला होता. हे थांबविण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून अनेक पक्षाला एकत्र आणण्याचे काम सीताराम येच्युरी यांनी केले. खऱ्या अर्थाने इंडिया आघाडीची स्थापना त्यांनी केली, असे ते म्हणाले.

डाव्या आघाडीचे स्फूर्तीस्थान अलिबाग होते. ते पुढे नेण्याचे काम नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील यांनी केले. त्यांचे काम आपण सर्वांनी अधिक जोमाने करण्याची गरज आहे. देशात सध्या वेगळ्या पध्दतीने राजकारण सुरु आहे. येच्युरी यांच्या निधनामुळे देशातील कष्टकरी, कामगार, डाव्या चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आहे. एक चांगला मित्र, गोरगरीबांसाठी लढणारा नेता गेल्याने मोठी हानी झाली असून, त्यांची आठवण कायमच स्मरणात राहील, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

येच्युरी डाव्या आघाडीचे प्रमुख मार्गदर्शक होते. शेकापची जडणघडण डाव्या विचारावर आधारित आहे. तेलगू ब्राह्मण वर्गात जन्माला आलेली व्यक्ती अधिकारी बनले असते. परंतु त्यांच्यामध्ये देशसेवेची भावना रुजली. कष्टकरी, कामगार, महिला, पीडितांसाठी उभे राहिले पाहिजे. त्यामुळे येच्युरी यांनी त्यांच्या हितासाठी चळवळ उभी केली, असे शेकापच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले. विद्यार्थी दशेपासूनच त्यांनी कष्टकरी, गोरगरीबांसाठी काम करण्यास सुरुवात केली होती. डाव्या पक्षाला ताकद देण्याचे काम त्यांनी केले आहे. रायगड जिल्ह्यातील २००७ मधील सेझ विरोधातील मोर्चाचे नेतृत्व येच्युरी यांनी केले होते. त्यामुळे सेझ विरोधातील लढ्यात त्यांचेही मोठे योगदान राहिले आहे, हे विसरता येणार नाही. एक लढवय्या व डाव्या चळवळीचा योध्दा हरपला, असे ॲड. म्हात्रे यांनी सांगितले.

सीताराम येच्युरी एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. एकनिष्ठा पाळणारे ते नेते होते. सध्या देशातील राजकारण पातळी सोडून चालू असताना, आपल्या पक्षाची विचारधारा शेवटच्या श्वासापर्यंत जनतेपर्यंत पोहोचवून ठेवण्याचे आदर्शवत काम त्यांनी प्रामाणिकपणे केले आहे. ते कामगार चळवळशी निगडीत होते. आपल्या लेखनातून त्यांनी डावे विचार व्यक्त केले, असे शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक यांनी सांगितले.

सीताराम येच्युरी यांची राजकीय वाटचाल विद्यार्थी दशेपासून झाली. त्यावेळच्या बोर्डाच्या परीक्षेत ते प्रथम आले. जगातले कोणतेही विषय सोप्या पद्धतीने सुलभ करून सांगण्याची त्यांची हातोटी होती. सध्याच्या राजकारणामुळे इंडिया आघाडी ही काळाची गरज आहे, हे ओळखून त्यांनी सर्व पक्षांना एकत्र करून एक मूठ बांधण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. येच्युरी यांच्या निधनामुळे कामगार चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आहे, असे शेकापचे राजेंद्र कोरडे यांनी सांगितले.

कुशाग्र बुध्दीमतेचा अभ्यासू नेता होता. न्यायाच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, हा विचार त्यांनी विद्यार्थी दशेपासूनच घेतला होता. विद्यार्थी, कष्टकरी, कामगार आदींच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यात त्यांचा हातखंडा होता. आदिवासींना मालकी हक्काच्या जमिनी देण्यासाठी येच्युरी यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे, असे प्रा. एस.व्ही. जाधव यांनी सांगितले.

## अजित पवार गटाला जोरदार धक्का

मात्र, नियुक्तीचा आदेश सरकार अस्तित्वात असेपर्यंत निघालेला नव्हता. नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. तेव्हा ईश्वर बाळबुद्धे यांनी अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आता वर्षभराच्या आत त्यांनी पुन्हा घरवापसी केली आहे.ओबीसी सम ाजासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांनी पुढाकार घेतला नाही. ओबीसी महामंडळावर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली नाही. एखाद्या खासगी कंपनीप्रमाणे पक्षाचा कारभार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. बाळबुद्धे यांनी शरद पवार यांची भेट घेऊन परत जाण्याचा निर्णय घेतला आहे. छगन भुजबळ यांची भेट घेऊन बाळबुद्धे यांनी आपला निर्णय कळवला आहे. त्यामुळे आता अजित पवार गटातील ओबीसी चळवळीचे नेतृत्व कोण करणार असा प्रश्न आहे.

## दुधाची तहान ताकावर

विस्तारातच त्यांना मंत्रिमंडळात घेतले जाईल, अशी चर्चा होती. मात्र, ऐनवेळी त्यांची मंत्रीपदाची संधी हुकली होती. त्यानंतर मंत्रिपदाची शपथ घेण्याचा योग भरत गोगावले यांच्याबाबत अद्यापही जुळून आलेला नाही. त्यामुळे भरत गोगावले नाराज असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, जे काही मिळालं, ते उशिरा मिळालं आहे. मी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करीत आहे. त्यांनी दिलेल्या एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाबाबत मुख्यमंत्र्यांशी बोलणार असल्याचे आ. भरत गोगावले यांनी माध्यमांना सांगितले.

## पनवेल-सायन महामार्गावरील बॅनर वेधतोय लक्ष

श्रीमंता ज्या वस्तू वापरता अथला जी लाईफस्टाईल जगतात. त्यावर लावण्यात आलेला जीएसटी अतिशय कमी आहे, तर, सामान्यांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंवर भरसाठ लावलेला जीएसटी या बॅनरच्या माध्यमातून तफावत दर्शवतो.

## ...पाच दरोडेखोरांना अटक

शोध सुरू आहे. यातील रोहन उर्फ गुड्डू गोपीनाथ नाईक हा सराईत गुन्हेगार असून, त्याने यापूर्वी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे दोन, खालापूर येथे एक जबरी चोरी आणि दरोड्याचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. यातील आरोपी हे दिवसा अन्य ठिकाणी नोकरी करायचे आणि रात्री मौजमजेसाठी एक्सप्रेस हायवेवर नागरिकांना लुटायचे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## भुयारी मार्ग २० सप्टेंबरपासून बंद

मात्र, त्यानंतर पुन्हा तो भुयारी मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. दुसऱ्या भुयारी मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी वाहतूक बंद ठेवून काम वेगाने सुरू झाले. यंदा २५ फेब्रुवारी २०२४ पासून शिमगोत्सवापूर्वीच कोकणात ये-जा करण्यासाठी लहान वाहनांना कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली. यानंतर तब्बल एका वर्षाने अपूर्ण असलेला दुसरा भुयारी मार्गदेखील गणेशोत्सवाच्या प्रारंभी मुंबईहून कोकणात जाणाऱ्या वाहनांसाठी सुरू करण्यात आला. त्यामुळे चाकरमानी गणेशभक्तांचा प्रवास सुरळीत होऊन कशेडी घाटातील ४५ मिनिटांचा धोकादायक घाट रस्त्यामुळे वेळ वाचण्यासह इंधनाच्या बचतीसोबतच वाहतूक कोंडीपासून चाकरमानी सुखावले होते. पाच दिवसांचे गौरी-गणपती विसर्जन आणि अनंत चतुर्दशीनंतर परतीचा प्रवास सुखकर होण्यासाठी राष्ट्रीय बांधकाम विभाग आणि स्थानिक वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन केल्यामुळे कशेडी घाट आणि पर्यायी भुयारी मार्गाच्या परिसरात वाहतुकीची कोंडी झाली नाही. गौरी गणपती विसर्जनानंतर मुंबईकडे परतणाऱ्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडीचा त्रास जाणवला नाही. त्यामुळे भुयारी मार्गाचा वापर केल्यामुळे कशेडी घाटाला पर्यायी मार्ग म्हणून उपयुक्तता सिद्ध झाली आहे. कशेडी घाटाला दोन्ही पर्यायी भुयारी मार्गातील सतर्कतेचा उपाय म्हणून बांधकाम खात्याने विशेष दक्षता घेतल्याचे दिसून आले.

## शेतकऱ्यांना नुकसानीची प्रतीक्षा

वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीत भात पिकांचे प्रचंड नुकसान झाले. अनेक भाताची रोपे पाण्यात कुजून गेली. शेत जमीन पाण्याने तुडूंब भरून गेली होती. काही रोपे पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. जुलै व ऑगस्टमध्ये भातशेती, जिरायती शेतीसह दोन हजार ३२४.२३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. ६६४ गावांतील सात हजार ८२५ शेतकऱ्यांची मोठी हानी झाली. त्यामध्ये जुलै महिन्यात ५७३ गावांमधील सहा हजार ८७९ शेतकऱ्यांच्या दोन हजार १९४.७२ हेक्टर तसेच ऑगस्टमध्ये ३९ गावांमधील १४७ शेतकऱ्यांच्या ५५.२३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले.

कृषी विभाग, जिल्हा परिषद व महसूल विभागाच्या कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक यांच्यामार्फत नुकसानीचे पंचनामे करण्यात आले. या पंचनाम्यांचा अहवाल कृषी विभागाने तयार करून शासनाला पाठविला. मात्र, अजूनपर्यंत शासनाकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरवर्षी शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा फटका बसत आहे. परंतु, शासनाकडून नुकसानीची तातडीने अंमलबजावणी होत नाही. नुकसानीसाठी वाट पाहावी लागत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यामध्ये ९८ हजार हेक्टर क्षेत्र भात लागवडीचे असून, आंब्याचे क्षेत्र सुमारे १४ हजार हेक्टर आहे. भातशेतीसह फळ बाग लागवडीवर शेतकरी भर देतात. मात्र त्यांच्या नुकसानीचा मोबदला देण्यास सरकार उशीर का करीत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जुलै व ऑगस्टमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाला अहवाल पाठविण्यात आला आहे, असे कृषी विभागातील सूत्रांनी सांगितले.

**नुकसानीवर दृष्टीक्षेप**

महिना - गावे - शेतकरी बाधित क्षेत्र
जुलै - ६२५- ७६७८ - २ हजार २६९ हेक्टर
ऑगस्ट - ३९ - १४७ - ५५.२३ हेक्टर
-------------------------------
एकूण - ६६४ - ७८२५ - २३२४.२३ हेक्टर

## मृत्यूनंतरही मरणयातना संपेना

अद्याप पूल मात्र बांधण्यात आलेला नाही. त्यामुळे लवकरात लवकर नागरिकांची गैरसोय होऊ नये. त्यासाठी ग्रामपंचायत किंवा लोकप्रतिनिधीने हा पूल बांधून द्यावा, अशी मागणी तळाघर वैशाली नगर बौद्ध वाडीचे रहिवासी प्रमोद गायकवाड यांनी केली आहे.

# गणपती बाप्पा जाताच घरादारांना लागली कुलुपे

**। तळा । वार्ताहर ।**

बाप्पाच्या आगमनाने गेले पंधरा दिवस घराघरात जणू चैतन्यच निर्माण झाले होते. पण विसर्जन होताच हीच बोलकी घरे अबोल झाली आणि पुन्हा एकदा या घरांना कुलूपे लागली.

गणेशोत्सवानिमित्त अवघ्या तळा तालुक्यातील गावं माणसांनी फ ुलून गेली होती. बंद दरवाजे सताड उघडे रहात होते. माणसांची वर्दळ या घरातून त्या घरात सुरु राहिली होती. गोडाधोडाच्या पदार्थांचे मधूर सुवास अवघ्या गल्लीत पसरत होता. विसर्जनानंतर करण्यात आलेल्या चमचमीत मटण रस्स्याचा सुवासही असाच भूक चाळविणारा ठरत होता. हजारो चाकरमान्यांमुळे बंद असणारी घरेही बोलकी वाटत होती. तळा तालुक्यात सण-उत्सवात आपापल्या गावाकडे चाकरमानी मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यातच गणेशोत्सव हा सर्वात मोठा सण आणि तो उत्सव मोठ्याप्रमाणात साजरा केला जातो. या गणेशोत्सवात गावागावात चाकरमानी मंडळी आपल्या कुटुंबासह गावात आली होती. सारा गाव माणसांनी फुलून गेला होता. एक आगळेवेगळे आनंदीमय चित्र पहावयास मिळत होते. सर्व घरे जणू आनंदाने बोलकी झाली होती. मात्र, आता गणेशोत्सव संपला आणि चाकरमानी मंडळी पुन्हा आपल्या कामावर रूजू होण्यासाठी मुंबई-पुण्याकडे परतीच्या प्रवासाला गेल्याने गावे रिकामी झाली आहेत.


**जाहीर सूचना**

याद्वारे जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरी **पर्सिस कैखोश्रू इराणी** जे फ्लॅट क्र. २१, ११वा मजला, सोनमर्ग बिल्डिंग, ६७बी नेपियन सी रोड, मुंबई - ४०० ००६ येथे राहणारे यांच्या येथे खाली लिहलेल्या परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात त्यांचे शीर्षकाची चौकशी करत आहोत.

कोणतेही व्यक्ति/व्यक्तिं ज्यांना खाली दिलेल्या परिशिष्टात वर्णन केलेल्या मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भाग/ हिस्सा संदर्भात कोणताही प्रकारचा दावा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा, आक्षेप जसे की विक्री, हस्तांतरण, देवाण घेवाण, वहिवाटीचा हक्क, हितसंबंध, भाग, गहाण, ताबा, भेट, विश्वस्त संस्था, भाडेपट्टी, लीव्ह ॲण्ड लायसन्स, वारसा, ताबा, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, संलग्नक, कार्यवाही, वाद, व्यवस्था / सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयचा हुकूम किंवा आदेश किंवा अन्यथा कसेही आणि कोणत्याही स्वरुपाचे असेल त्यांनी याद्वारे कृपया लेखी स्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत यासह आवश्यक सहाय्यक कागदपत्रेचे प्रमाणित खऱ्या प्रतीसह निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय १ला मजला, फ्री प्रेस हाऊस, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ येथे ह्या सूचनेचा तारखेपासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे, अन्यथा, असे मानले जाईल की व्यक्ति(व्यक्तिं) चे कोणताही दावा नाही आणि / किंवा अशा व्यक्ति/चे सर्व दावे, जर काही असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल आणि आमचा अशिल व्यवहार पूर्ण करण्यासाठी पुढे जाईल.

**येथे उल्लेखित परिशिष्ट**

जमीनीचे सर्व तुकडे आणि हिस्से ज्याचे प्लॉट क्र. ५, सी.एस. क्र. १९४ क्षेत्रफळ १६३८९.८ चौरस मीटर्स समतुल्य ४ एकर्स आणि २ गुंठा जे माथेरान हिल स्टेशन तालुका कर्जत, जिल्हा कोलाबा (आता रायगड) येथे स्थित यासह 'कच कॅसल' म्हणून ओळखले जाणारे बंगलो / रचना आणि त्यावर उभा असलेल्या इतर संरचना.

१९ सप्टेंबर २०२४ रोजी दिनांकित.

सही/-
**मुर्तझा काचवाला**
भागीदार
आर्गस पार्टनर्स
सॉलिसिटर्स आणि ॲडव्होकेट्स



**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १५२/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. राहुल अशोक पाटोले
वय २८ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. नाणोरे,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदर अर्जदार श्री. राहुल अशोक पाटोले यांची आजी के. लक्ष्मी दगडू पाटोळे ही दि. २४/०१/२०२१ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ३०/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आजी कै. लक्ष्मी दगडू पाटोळे ही दि. २४/०१/२०२१ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. राहुल अशोक पाटोले यांची आजी कै. लक्ष्मी दगडू पाटोळे ही दि. २४/०१/२०२१ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता.: १७/०९/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**



दुरुस्त जाहीर नोटीस
अर्ज क्र. ३९/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. चंद्रकांत रामजी सवातकर
वय : ६७ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. मु. पो. गोवेले,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गोवेले, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. चंद्रकांत रामजी सवातकर यांची चुलत आजी कै. लक्ष्मी बाळु सवातकर ही दि. १७/०८/१९५२ रोजी मौजे गोवेले, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १८/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची चुलत आजी कै. लक्ष्मी बाळु सवादकर ही दि. १७/०८/१९५२ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. चंद्रकांत रामजी सवातकर यांची चुलत आजी कै. लक्ष्मी बाळु सवातकर ही दि. १७/०८/१९५२ रोजी मौजे गोवेले, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता. : ०३/०९/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**



**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १३८/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. शमसुद्दीन अब्दुल करीम धनसे
वय ५८ वर्षे, धंदा शेती.
सध्याचा पत्ता :- रा. ११८/१२२, — अर्जदार
बनाटवाला बिल्डींग, रूम नं. ८,
पहिला मजला, शायदा मार्ग,
भिमपुरा, डोंगरी चाळ, मुंबई-४००००९
कायमचा पत्ता :- रा. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. शमसूद्दीन अब्दुल करीम धनसे यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०८/०६/१९६६ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद साम नेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. २२/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०८/०६/१९६६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. शमसूद्दीन अब्दुल करीम धनसे यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०८/०६/१९६६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १८/०९/२०२४ — सही
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**



**महाराष्ट्र शासन**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०१**
Email :- mahad.ee@mahapwd.com Ph.No. 20145 222243
NOTICE INVITING e-TENDER
Notice No.08 for 2024-25

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग महाड यांनी राखून ठेवला आहे.

| ई-निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पाने येथे शाळेजवळ संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड | ९९७५४५.०० | १००००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| २ | निजामपूर स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे, ता. महाड. जि. रायगड | ८४७२८२.०० | ९०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ३ | देवघर येथे सभामंडप बांधणे, ता. महाड, जि. रायगड | ८३६६१८.०० | ९०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ४ | शिंदे-आव्हाड विहीर दुरूस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड | ८३६०६०.०० | ९०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ५ | रायगडवाडी स्मशानभूमी बांधणे, ता. महाड, जि. रायगड | ८१६१७३.०० | ९०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ६ | नेवालीवाडी सभामंडप बांधणे ता. महाड, जि. रायगड | ८१०९६७.०० | ९०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ७ | टकमकवाडी साकव बांधणे, ता. महाड, जि. रायगड | ५९८६२५.०० | ६०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ८ | खडकी वाडी साकव बांधणे, ता. महाड, जि. रायगड | ५९६७४४.०० | ६०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| ९ | नेवाळीवाडी स्मशानभूमी बांधणे, ता. महाड, जि. रायगड | ४२४४७७.०० | ५०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |
| १० | रायगडवाडी कोळी आवाड अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड | ४१८०३६.०० | ५०००.०० | ०६ महिने | ५९०.०० | वर्ग ८ व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. २३.०९.२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दि. ३०.०९.२०२४ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. ०१.१०.२०२४ वेळ ११.०० पासून |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी यावरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा/४७०
दिनांक : १९.०९.२०२४

सही/-
**(सलोनी सं. निकम)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/७९**



सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड-पुष्पक नोड | | | | | | | | |
| १ | ५४/ NUR | मौजे-गव्हाण तालुका- पनवेल. जिल्हा- रायगड<br>प्रकरण क्र. २८५ दि. ०९.०९.२०२४ | २७६/४<br>एकूण क्षेत्र | ०-२७-३०<br>०-२७-३० | ४३० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील **भूखंड क्र, ८०, सेक्टर २६ क्षेत्र ४३० चौ.मी.** | **१) केशव काळूराम देशमुख<br>२) विद्या दत्तात्रेय देशमुख<br>३) नरेंद्र काळूराम देशमुख<br>४) नंदकुमार काळूराम देशमुख<br>५) भाविक दत्तात्रेय देशमुख<br>६) महेश्वर काळूराम देशमुख** | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज व पूरक कागदपत्रांसह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३४/२०२४-२५

निवडक

## भटक्या कुत्र्यांचा हल्ला

**उरण :** देऊळ वाडीत भटक्या कुत्र्यांनी अनेकांवर हल्ला केल्याची घटना घडली आहे. यामध्ये लहानांपासून मोठ्यांपर्यंत अशा ३० ते ४० जणांवर कुत्र्यांनी हल्ला केलेला आहे. याबाबत नगरपालिका प्रशासनाच्या आरोग्य विभागाकडे तक्रार करूनही ते याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शहरातील अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांची दहशत वाढत चालली आहे. यामुळे लहान मुले, महिला, वृद्ध यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## पुरस्कार वितरण सोहळा

**माणगाव :** कुणबी भवन हॉलमध्ये रविवारी (दि.२२) सकाळी ११ वाजता अविष्कार फाउंडेशन इंडिया कोल्हापूर या सामाजिक संस्थेतर्फे रायगड शाखेच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त गुणवंत शिक्षक, शिक्षिका तसेच पत्रकार यांचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी उद्योजक विजय मेथा हे असून रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना अध्यक्ष सोपान चांदे, सुवर्णा जाधव, फाउंडेशनचे संस्थापक संजय पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक

**पनवेल :** २१ व २२ सप्टेंबर दरम्यान साजरा होणाऱ्या गौरा गणपती उत्सवाच्या अनुषंगाने सार्वजनिक गौरा गणपती उत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक गुरूवारी (दि.१९) वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थित शहर पोलीस ठाण्यात पार पडली. यावेळी २८ मंडळाचे पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते. यावेळी आगमन ते विसर्जन मिरवणूक दरम्यान ध्वनी प्रदूषण संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## आरोग्य तपासणी शिबीर

**पनवेल :** महाराष्ट्र शासन व वायएमटी होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्या विद्यमाने वडघर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी (दि.२०) मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले आहे. यावेळी श्वासनलिकेचे आजार, त्वचारोग, गजकर्ण, मुरुमे, ॲलर्जी पोटाचे विकार, आम्लपित्त, जुलाब, मूतखडा, पित्ताशयाचे खडे, स्त्रियांचे आजार, पाळीच्या तक्रारी, डोकेदुखी लहान मुलांचे आजार इत्यादी आजाराबाबतची तपासणी या शिबिराच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## तळोजातून इसम बेपत्ता

**पनवेल :** तळोजा फेज-२ येथील अमितकुमार कृष्णकुमार मिश्रा (५०) हा इसम बेपत्ता झाला असून रंग सावळा, चेहरा उभट, उंची ५ फूट ५ इंच, नाक सरळ, केस काळे पांढरे, चष्माचा वापर, हातात टायटन कंपनीचे घड्याळ, बांधा मध्यम असून अंगात पांढऱ्या रंगाचा फुल शर्ट व राखाडी रंगाची फुल पॅन्ट परिधान केली आहे. या इसम ाबाबत कुणालाही माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक सुनील घरत (९७०२०५०८७८) या क्रमांकावर संपर्क साधावा.

# केबल टाकण्यासाठी अवैध खोदकाम

## ग्रामपंचायत प्रशासनाविरूद्ध संताप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतिच्या हद्दीत असलेल्या रस्त्यावर एका खासगी कंपनीकडून केबल टाकली जात आहे. ही केबल नेरळ गावातील गटारे तसेच रस्त्यांच्या बाजूला खोदकाम करून टाकली जात असून त्याला नेरळ ग्रामपंचायतीच्या प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत केबल टाकू नये असा निर्णय झालेला असताना देखील संबंधित कंपनीकडून दिवसरात्र केबल टाकण्याची कामे सुरु आहेत.

यावर्षी पावसाळ्यात ग्रामपंचायत हद्दीत असलेली गटारे थोडासा पाऊस पडला तरी तुडुंब भरून वाहत असल्याचे दिसून आले होते. यानंतर काही जागरूक ग्रामस्थांनी गटारे तुडुंब भरून का वाहतात? याचा अभ्यास केला असता नेरळ गावातील गटारांमध्ये केबल टाकण्यात आल्याचे दिसून आले. यानंतर ३ सप्टेंबर रोजी नेरळ ग्रामपंचायतीची ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. ग्रामस्थांनी गटारांमध्ये कोणत्या कंपनीच्या केबल टाकण्यात आल्या आहेत, याची माहिती मागितली असताना एअरटेल कंपनीच्या केबल टाकण्यात येत असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून देण्यात आली.

याबाबत ग्रामसभेत ग्रामस्थांनी केब्बल टाकण्याची परवानगी ग्रामपंचायतीकडून देण्यात आली आहे का, रस्ते खोदण्यासाठी किती लाखाचा निधी सुरक्षा अनामत म्हणून राखीव ठेवण्यात आला आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित केले असता सरपंच उषा पारधी या निरुत्तर झाल्या. यामुळे ग्रामस्थांच्या मागणीनुसार ठराव घेण्यात आला आणि गटारांमध्ये तसेच रस्त्याच्या कडेला टाकण्यात येत असलेली केबल तात्काळ काढण्यात यावी, अशी मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता.

मात्र, ग्रामसभा झाल्यानंतर देखील आजही नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्याच्या आजूबाजूला केबल टाकण्याचे काम वेगाने सुरु आहे. रस्ते खोदून केबल टाकल्या जात असून त्यासाठी नेरळ ग्रामपंचायतीकडून कोणत्याही स्वरूपातील परवानगी देण्यात आलेली नाही. दुसरीकडे नेरळ ग्रामीपंचायतीच्या कार्यालया बाहेर गेली आठ दिवस रस्त्याच्या आजूबाजूला खोदकाम केले जात असून ते काम बंद करण्याची हिम्मत प्रशासन करताना दिसत नाही.

यामुळे नेरळ ग्रामपंचायतीमध्ये चाललंय तरी काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, गटारांमध्ये टाकण्यात आलेल्या केबल अजूनही काढण्यात आल्या नाहीत. शिवाय नव्याने रस्ते खोदून केबल टाकण्यात येत असल्याने या केबल कंपनी विरुद्ध संताप व्यक्त होत आहे.

# ईद निमित्त सरबत वाटप



**। सोगाव । वार्ताहर ।**

इस्लाम धर्मात ईद मिलाद-उन-नबी हा सण पैगंबर हजरत मोहम्मद यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे सोमवारी (दि.१६) ईद-ए-मिलाद निमीत्त मुस्लिम बांधवांकडून अलिबाग-रेवस मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सरबत वाटप करण्यात आले. यावेळी किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांनी चोंढी येथील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

ईद-ए-मिलाद निमित्त या दिवशी गरिबांना दानही केले जाते. यानिमित्ताने चोंढी येथील मुस्लिम बांधवांकडून अलिबाग रेवस मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सरबत वाटून हा सण मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड यांनी ईद-ए-मिलाद निमित्त चोंढी येथील मुस्लिम बांधवांना आवर्जून उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी चोंढी येथील आसिफ मलिक, मुस्तफा सय्यद, लियाकत शेख, अब्दुलरेहमान मलिक, निसार चोगले, आलम खान, सिराज माजगणकर, दानिश मलिक, साहिल कर्वेकर, कैस कर्वेकर, अमान कर्वेकर, आसिर माजगणकर, सैबाज चोगले, अरमान मलिक, नदीम आत्तार, मुझफ्फर आत्तार, बदरुद्दीन मुजावर, साकीब कुरेशी आदी मुस्लिम समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

# कदम यांच्या पाठपुराव्याला यश



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील काही महत्वाच्या पॉईंट भागात नगरपरिषदेच्या माध्यमातून पर्यटकांच्या सुविधेसाठी रेडिमेड सुलभ शौचालय उभारले होते. परंतु, अनेक वर्षांपासून या शौचालयात पाण्याची गैरसोय झाल्यामुळे पर्यटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. यासाठी निसर्ग पर्यटन पॉईंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष संतोष कदम यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयात सातत्याने पाठपुरावा केला होता.

याची दखल घेऊन कार्यतत्पर प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी ज्या ठिकाणी पाण्याची सोय नाही त्याठिकाणी सुस्थितीत पाणी आणि स्वच्छता बाबतीत संबंधित कामगार वर्गाला सूचना केल्या आहेत. याबद्दल संतोष शिंदे यांनी राहुल इंगळे यांसह कामगार वर्गाचे आभार व्यक्त केले आहेत.

## ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई; बारा जणांवर गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल जवळील कोन येथील साई पॅलेस बिंदास बार अँड ऑर्केस्ट्रावर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत बार मालक, मॅनेजर, पुरुष वेटर, महिला सिंगर अशा बारा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेलमधील कोन गाव येथील साई पॅलेस बिंदास बार अँड ऑर्केस्ट्रा येथे रविवारी (दि.१५) मध्यारात्रीच्या सुमारास सात महिला सिंगर भडक वेशभूषा करून बारमध्ये सुरू असलेल्या म्युझिकच्या तालावर गिऱ्हाईकांची लगट साधून अंगविक्षेप करून भिभत्स वर्तन करताना आढळून आल्या. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले गेल्यामुळे बारचे मालक बाबुराव तुकाराम म्हात्रे, मॅनेजर मोहन केंगे गौडा व पुरुष वेटर यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना तशी परवानगी, उत्तेजन व प्रोत्साहन दिले असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुरुड पोलिसांचा सन्मान

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुडमध्ये गौरी गणपती विसर्जनच्या मिरवणुकीत दोन धर्मात तेढ निर्माण झाले होते. यामुळे मुरुड शहरांसह पंचक्रोशी भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे रायगड अलिबाग पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी यांनी मुरुड तालुक्यातील नाक्या नाक्यावर व संवेदनशील भागात कडक बंदोबस्त ठेवला होता. दोन्ही समाजाच्या प्रतिष्ठीत नागरिकांची तातडीने बैठक घेऊन शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले होते. याला दोन्ही धर्माकडुन चांगला प्रतिसाद मिळाला. तरी देखील पोलिस अधिकारी व कर्मचारी या घटनेकडे लक्ष ठेवून होते.

यावेळी दोन्ही धर्माला शांत करण्याचे काम पोलिसांनी उत्तम केल्याने मुरुड शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी अलिबाग उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी, पोलिस निरीक्षक उदय झावरे यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. तसेच, पोलिस उपनिरीक्षक दिपक राऊळ यांना पदोन्नती मिळाल्याने त्यांचा ही विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी अशिलकुमार ठाकूर, कुणाल सतविडकर राजेश मुळेकर, राहुल कासार, स्वप्नील कांबळे, मॉंटी दांडेकर, विशाल कोलवणकर, यश म ाळी, सचिन करंदेकर प्रतीक उमरोटकर, सिद्धेश बाथम, सिद्धेश सुभेदार आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.



# अंजुमन महाविद्यालयाला मानांकन




**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुडमधील अंजुमन इस्लाम ही एक जुनी शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना दर्जेदार पदवी शिक्षण देण्याचे कार्य सन २००९ पासुन अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मार्फत करण्यात येत आहे. यु.जी.सी संचलित नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रिडिएशन काऊंसिल (नॅक) द्वारे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा याची तपासणी करण्यात येते. यानंतर महाविद्यालयाला उचित मानांकन देण्यात येते. या महाविद्यालयास प्रथम २०१९ साली बी मानांकन प्राप्त झाले होते. यानंतर नॅकद्वारे पाच वर्षांनी पुनः पडताळणी ३ व ४ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. यासाठी नॅक पिअर टीममध्ये डॉ. के.एम. अबूबकर चेअरमन, डॉ. बुधीन गोगई समन्वयक व डॉ. तरंजीत सूद सदस्य म्हणून लाभले होते.

# नागोठण्यात चार टन निर्माल्य जमा



**। नागोठणे । वार्ताहर ।**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्याकडून रायगड जिल्ह्यात सर्वत्र पर्यावरणाच्या संरक्षणासाठी गणेश विसर्जन स्थळी निर्माल्य कलशामध्ये जमा करण्याचे अभियान राबविण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून नागोठणे शहर व परिसरांतही दिड दिवस, पाच दिवस व अनंत चतुर्दशी गणपतींच्या विसर्जन स्थळी सुमारे चार टन निर्माल्य जमा करण्याचा स्तुत्य उपक्रम नागोठण्यातील श्री सदस्यांकडून राबविण्यात आला आहे.

नागोठणे शहरातील आंबा नदीच्या किनारी असलेल्या विसर्जन घाटावर तसेच शृंगार तलाव, वरवठणे, वेलशेत, गांधे, चोळे आदी ठिकाणच्या गणेश विसर्जन स्थळांवर श्री सदस्यांकडून निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते. हे जमा झालेले सर्व निर्माल्य त्यामधील प्लास्टिक बाजूला करून नगोठण्यातील अंबा घाटा लगतच असलेल्या जागेत एका खोल खड्ड्यात साठवून बुजविण्यात आले आहे. नंतर या निर्माल्याचा डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून परिसरांत लावण्यात आलेल्या वृक्षांसाठी खत म्हणून वापर करण्यात येणार असल्याचे श्री सदस्यांकडून सांगण्यात आले आहे.

## जयंत पाटील यांच्याकडून कोळी कुटुंबीयांचे सांत्वन

**। अलिबाग । वार्ताहर ।**



नवगांव येथील बोरेश्वर मच्छिमार सोसायटीचे चेअरमन तथा शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते दत्ताराम कोळी यांच्या वडीलांचे रविवारी (दि.१५) निधन झाले. मारूती बामा कोळी असे त्यांचे नाव असून निधनासमयी ते ८४ वर्षांचे होते. मारूती कोळी हे मच्छिमार सोसायटीचे माजी चेअरमन कै. बामा सखो यांच्या होडीवर २० वर्षे तांडेल म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ बहिण व नातवंड असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरूवारी (दि.२६) होणार असल्याचे कोळी कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांनी दत्ताराम पाटील यांच्या निवास स्थानी जाऊन कोळी कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी नवगाव मच्छिमार सोसायटीचे माजी चेअरमन सुरेंद्र कटोर, श्रीरंग कटोर, नरेंद्र थळकर तसेच रायगड बाजारचे व्हाईस चेअरमन प्रमोद घासे व आरडीसीसी बँकेचे डेप्युटी सीईओ वाघमोडे उपस्थित होते.

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदत वाढ

# व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अभियांत्रिकी, वैद्यकिय व इतर व्यावसायिक शैक्षणिक प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरू झाली आहे. मात्र, विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये हे प्रमाणपत्र सादर करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याची मुदत वाढ करण्यात आली आहे. याबाबत शासनाकडून परिपत्रक काढण्यात आले आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या एसईबीसी, इतर मागासवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.



व्यावसायिक शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील असंख्य विद्यार्थ्यांची गेल्या दोन महिन्यांपासून हे प्रमाणपत्र काढण्यासाठी धावाधाव सुरु झाली आहे. ऑनलाईन अर्ज करण्यापासून जात वैधता प्रमाणपत्र समितीच्या कार्यालयात कागदपत्रे जमा करण्यापर्यंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांची लगबग सुरु आहे.

जिल्ह्यातील जात वैधता प्रमाणपत्र समितीच्या कार्यालयात इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)चे सुमारे साडेतीनशेहून अधिक विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल आहेत. मात्र, हे प्रमाणपत्र मुदतीमध्ये शिक्षण संस्थेत दाखल न झाल्यास प्रवेश रद्द होण्याची भिती निर्माण झाली होती. यामुळे शासनाने अभियांत्रिकी, वैद्यकिय आणि इतर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या एसईबीसी, ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचे काम केले आहे.

प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. यासाठी सहा महिन्याची मुदत वाढवून दिली आहे. शासनाने त्यानुसार परिपत्रक काढले आहे.

> **व्यावसायिक शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी धावाधाव सुरु आहे. मात्र, शासनाने शिक्षण संस्थामध्ये प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याची मुदत दिली आहे. त्यामुळे या कालावधीच्या आत हे प्रमाणपत्र देणे शक्य होईल. आता थेट मेलवर प्रमाणपत्र मिळत असल्याने कार्यालयात जाऊन प्रमाणपत्र घेण्याची पायपीट देखील थांबली आहे.**
> **-पार्थ पाटील, विद्यार्थी**



● मा. उपनगराध्यक्ष दिलीप लाड (फणसडोंगरी पेण) यांच्या घरचा राजा.

# मोदींचे नवे खेळणे

लहान मुलाला दर काही दिवसांनी नवे खेळणे लागते. त्यात गुंतले की मग बाकीच्या गोष्टी, आणि मुख्यतः जुनी खेळणी, ते विसरून जाते. पण ते निष्पाप असते. त्याच्या या छंदामुळे आईबापांना थोडा खर्च होत असला तरी बाकी ताप होत नाही. नरेंद्र मोदींच्या नवनव्या खेळण्यांबाबत मात्र तसे म्हणता येत नाही. शिवाय ही खेळणी ते विरोधकांना आणि देशाला भलत्याच गोष्टींमध्ये गुंतवण्यासाठी आणतात. जनतेचे खरे प्रश्न त्यामुळे विसरले जातात. त्याहूनही गंभीर म्हणजे अनेकदा मोदींची ही खेळणी लोकांच्या जिवावरही बेततात. अलिकडे चायनीज खेळण्यांचे रंग किंवा प्लास्टिक खेळण्यांसाठी घातक ठरते. काही वेळेला त्यातील बॅटऱ्यांचे स्फोट होतात. त्याप्रमाणे नोटबंदी नावाचे जे खेळणे मोदींनी पूर्वी आणले होते त्यामुळे अनेकांचे जीव गेले आणि लक्षावधींचे रोजगार बुडाले, धंदे बसले. आता एक देश एक निवडणूक नावाचे एक खेळणे हजर झाले आहे. लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचा प्रस्ताव आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने याला मंजुरी दिली असून येत्या हिवाळी अधिवेशनात त्याबाबतचे विधेयक सादर होणार आहे. गेल्या चार-पाच वर्षांपासून मोदी याविषयी बोलत होते. त्यासाठी रामनाथ कोविंद समिती स्थापण्यात आली. मात्र या समितीचा अहवाल इतक्या लवकर येईल आणि सरकार त्यावर लगेच निर्णय घेईल अशी कल्पना कोणी केली नव्हती. तशी तातडीही नव्हती. पण मोदींनी ज्या रीतीने हा मुद्दा पुढे रेटला आहे ते पाहता विरोधकांना सावध राहावे लागणार आहे. त्यामागचे अंतःस्थ हेतू काय आहेत यावर नीट नजर ठेवून त्यांना अटकाव करावा लागणार आहे. विरोधकांना यावरच्या चर्चेत गुंतवून आपल्या इतर भानगडींकडे लक्ष जाऊ नये अशीही यातली योजना असू शकते. किंवा, देशातील संसदीय लोकशाही खिळखिळी करण्याच्या दूरगामी योजनेचा हा सर्व भाग असू शकतो.

## खर्चाबद्दल भाजपने बोलावे?

हा विधेयक संमत होण्यासाठी संसदेत दोनतृतियांश बहुमत लागेल. त्यासाठी लोकसभेत ३६४ आणि राज्यसभेत १६४ मते लागतील. भाजप आघाडीकडे २९२ आणि ११२ इतकीच मते आहेत. बाकीची मते गोळा करणे सोपे नाही. खुद्द भाजपचे मित्र तेलुगु देसम किंवा अन्य पक्षही त्याला सहजासहजी मान्यता देणार नाहीत. त्यामुळे हे प्रकरण बहुदा संयुक्त संसदीय समितीकडे जाईल. नंतर समजा ते संमत झालेच तरीही त्याला न्यायालयात आव्हान दिले जाईल. मात्र या दरम्यानच्या काळात भाजप एक चांगले काम करू पाहतो आहे आणि विरोधक मात्र ते अडवून धरत आहेत असा देखावा उभा करण्याची संधी मोदींना मिळणार आहे. एकत्र निवडणुका घेतल्या तर सरकारचा खर्च वाचेल असा दावा केला जातो. प्रत्यक्षात मतदान व मोजणी यासाठी लागणारा खर्च हा आपल्या देशाच्या मानाने फार नाही हे अनेक जाणकारांनी यापूर्वीच दाखवून दिले आहे. निवडणुकांमध्ये भयानक खर्च करतात ते राजकीय पक्ष. सध्या भाजप त्यात आघाडीवर आहे. त्याने निवडणूक रोखे व इतर मार्गांनी हजारो कोटी रुपये जमवून ठेवले आहेत. मोदींपासून गल्लीतल्या नेत्यांचे झंझावाती दौरे, विमाने आणि हेलिकॉप्टर्स, त्यांच्या प्रचंड खर्चिक सभा, दिवसरात्र चालणाऱ्या जाहिराती यातून भाजपने निवडणुकांचा खर्च शेकडो पटींनी वाढवून ठेवला आहे. आणि आता त्यांचे नेते खर्चाबाबत गळा काढत आहेत. निवडणूक रोख्यांची भानगडबाज योजना यांनीच आणली. सर्वोच्च न्यायालयाने ती बेकायदा ठरवली. पण त्यात जमा झालेले पैसे भाजपकडेच राहिले. ते जप्त करा असा आदेश काही चंद्रचूडांनी दिला नाही. भाजपने या पैशांचा आजतागायत हिशेब दिलेला नाही. या देणग्यांच्या बदल्यात कंपन्यांना कंत्राटे दिली गेली. त्याचा खुलासा झालेला नाही. आता हेच लोक आम्ही निवडणुकीचा खर्च वाचवण्यासाठी आम्ही क्रांतिकारी पाऊल उचलत आहोत असे भासवत आहेत. हा ढोंगीपणाचा कळस आहे.

## छोट्या पक्षांवर गदा

सततच्या निवडणुकांमुळे आचारसंहिता लागतात आणि सरकारचे काम ठप्प होते असा आक्षेप घेतला जातो. महाराष्ट्रात पाच वर्षांपूर्वी लोकसभा आणि विधानसभा झाल्या. त्यानंतर मधली पाच वर्षे आचारसंहिता लागू नसलेलीच होती. महापालिका, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका यांनी गेल्या दोन वर्षांपासून लटकावून ठेवल्या आहेत. त्यांची आचारसंहिता लागली असती तरी तीही काही दिवसांपुरती असती. त्यांच्यापेक्षा मंत्र्यांचे राजकीय कार्यक्रम, सणसमारंभाच्या सुट्ट्या यामुळे सरकारी कामकाज जास्त काळ ठप्प राहत असेल. शिवाय, आचारसंहितेमुळे कोणते असे निर्णय रेंगाळले व नंतर सरकारने ते फार चपळाईने घेतले याचीही श्वेतपत्रिका मोदी सरकारने प्रसिध्द करावी. थोडक्यात, सरकार जी कारणे पुढे करीत आहे ती तकलादू आहेत. निवडणुका स्वाभाविकपणे एकत्र होत असतील तर विरोध असण्याचे कारण नाही. १९५० नंतर पंधरा वर्षे त्या होत होत्याच. पण भारताइतक्या आकाराने प्रचंड आणि वैविध्यपूर्ण देशात राजकारण वेगवेगळे आकार घेणे स्वाभाविक आहे. केरळ व तमिळनाडूमध्ये दोनच पक्ष आळीपाळीने सत्तेत येतात. गोव्यासारख्या छोट्या राज्यांमध्ये एक-दोन सदस्य फिरले तरी सरकारे पडतात. खुद्द भाजपनेच अशी फोडाफोडी केलेली आहे. महाराष्ट्रात चार प्रमुख आणि इतर अनेक छोटे पक्ष आहेत. त्या आघाड्या कशाही मोडू किंवा घडू शकतात. एकत्रित निवडणुका घ्यायच्या झाल्याच तर अशा पन्नास प्रकारच्या शक्यतांचा विचार व त्यासाठी तरतुदी कराव्या लागतील. २०२९ पासून समजा ही योजना लागू झाली आणि दोनच वर्षात महाराष्ट्रातले सरकार पडले तर पुन्हा निवडणूक घेऊन त्या विधानसभेची मुदत तीनच वर्षे ठेवायची अशी तरतूद या कायद्यात प्रस्तावित केली जाणार आहे, असे म्हणतात. यामुळे अनेक गोंधळ निर्माण होणार आहेत. ज्यांचा विचार सर्व पक्षांना करावा लागणार आहे. एकच एक निवडणुकीमुळे राज्यातले छोटे प्रश्न बाजूला पडून निव्वळ हिंदुत्वासारखे विषारी मुद्दे प्रबळ ठरण्याचा मोठा धोका आहे. किंबहुना, भाजपला नेमके तेच करून विरोधक व प्रादेशिक पक्षांना संपवायचे आहे.

### विचार

# न्यायिक सुधारणांची अवघड वाट

***आजघडीला सामान्यजनांनी कोर्टाची पायरी चढली, तरी न्याय मिळण्याची खात्री नसते. दुसरे म्हणजे न्यायालयात गेल्यानंतर निकाल कधी लागेल, याची शाश्वती नसते. अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात बोलताना भारताचे कायदे पुरेसे कडक आहेत; परंतु निकाल वेळेवर लागत नाही, असे म्हणत न्यायव्यवस्थेतील विलंबाकडे निर्देश केला. मात्र न्यायाच्या विलंबाचे खापर केवळ न्यायव्यवस्थेवर फोडून चालणार नाही.***



**शिवाजी कराळे**

शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, अशी आपल्याकडे एक सल्लावजा सूचना दिली जाते. त्यात दोन अर्थ अभिप्रेत असतात. एक म्हणजे कोर्टाची पायरी चढली, तरी न्याय मिळण्याची खात्री असेलच असे नाही. दुसरा अर्थ म्हणजे न्यायालयात गेल्यानंतर निकाल कधी लागेल, याची शाश्वती नसते. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे असेही एक वाक्य प्रचलित आहे. सर्वोच्च न्यायालयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित समारंभावर कोलकात्ता, बदलापूरच्या घटनांचे सावट होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समारंभात बोलताना भारताचे कायदे पुरेसे कडक आहेत; परंतु निकाल वेळेवर लागत नाही, असे विधान केले. त्यांचा अंगुलीनिर्देश न्यायव्यवस्थेतील विलंबाकडे होता. मात्र न्यायाच्या विलंबाचे खापर केवळ न्यायव्यस्थेवर फोडून चालणार नाही. पिढ्या निघून जातात; पण निकालाची तारीख कधीच येत नाही. आरोपी मोकळे फिरतात आणि पीडित भीतीच्या वातावरणात जगतात. सरकार, वकील आणि न्यायाधीशांनी याचा विचार केला असेल; पण या दिशेने कोणतेही गंभीर प्रयत्न झाले नाहीत. ते केले असले, तरी सामान्य माणसांना दिसत नव्हते किंवा न्याय प्रक्रियेतही दिसून आले नाहीत. न्यायालयीन प्रक्रिया इतकी सोपी आणि सुलभ व्हायला हवी की सामान्य माणसाला कोर्टामध्ये जाण्याची भीती वाटू नये. विशेषतः पीडितांना न्यायव्यवस्थेचा आधार वाटला पाहिजे. 'कानून के हाथ लंबे होते है'ची प्रचिती आली पाहिजे. केवळ न्यायव्यस्थेला दोष देऊन चालणार नाही. प्रलंबित खटल्यांची संख्या, न्यायाधीशांची संख्या, न्यायालयाची दालने आदी मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची आहे. अशा या दोन्ही बाजू तपासणे आता कळीचे बनत आहे.

मागे सर्वोच्च न्यायालयाने निर्दर्शनास आणल्याप्रमाणे हरकती आणि तारखा मागण्यात सरकारी यंत्रणा आघाडीवर असतात. वेळेवर म्हणणे मांडत नाहीत. तारखेनंतर तारखेची नकारात्मक संस्कृती न्यायव्यवस्था किती काळ पाळत राहणार, याचा विचार करायला हवा. न्यायाचे विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक भाषांमध्ये न्यायदानाचा तपशील देण्याची संकल्पना त्या त्या राज्यांनी अंगीकारली, तरी बऱ्याच गोष्टी सोप्या होऊन जातील. परिणामांचा विचार करून जिल्हा न्यायालये जामीनासारख्या गोष्टींवर निकाल देत नाहीत. त्यामुळे ही प्रकरणे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातात. पुराव्यांच्या आधारे जिल्हा न्यायालयांनी जामीनांची प्रकरणे तातडीने निकाली काढली, तरी दाव्यांची संख्या कमी होऊन जाईल. आरोपी तारखा वाढवत राहतात. आजही न्याय सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आणि दूर आहे. जलद न्याय मिळाल्यास गुन्ह्यांना बऱ्याच अंशी आळा बसू शकतो. तसे झाल्यास कोलकाता, बदलापूरसारख्या घटनांमध्ये नक्कीच घट होईल. न्याय किंवा निर्णयाला दिरंगाई झाल्यामुळे गुन्हेगारांमध्ये भीती नाही. गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे त्वरीत न्याय. याशिवाय सध्या तरी दुसरा पर्याय नाही.

आपण सुसंस्कृत राष्ट्र म्हणून ओळखले जात असल्यामुळे, न्यायालयीन प्रक्रियेशिवाय गुन्हेगारांना शिक्षा करण्याचा दुसरा मार्ग असू शकत नाही. गंभीर घटना घडल्यानंतर गुन्हेगारांना चौकात उभे करून शिक्षा करणे योग्य आहे असे काहींना वाटू शकते; परंतु ही व्यवस्था समर्थनीय नाही. किंबहुना, काही लोकांमध्ये अशा प्रकारची विचारसरणी विकसित होण्याचे कारण म्हणजे न्यायाला होणारा विलंब. न्यायप्रक्रिया सुधारण्याचे ठरवल्यास प्रलंबित खटले आणि नवीन खटल्यांना होणारा विलंब यांचा प्रश्न सुटू शकतो. हे करायचे असेल तर वकील, पक्षकार, न्यायमूर्ती आणि सरकार यांना मिळून तातडीने पुढे यावे लागेल. न्यायालयांमधील वाढत्या खटल्यांबाबत पुन्हा एकदा गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा न्यायालयांच्या राष्ट्रीय परिषदेत राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि केंद्रीय कायदा मंत्र्यांनी एकमताने हा प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे या समस्येकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष गेले आहे. देशातील ९० टक्के खटले कनिष्ठ न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. तिथे खटल्यांचा मोठा ढीग आहे. देशातील न्यायालयांसमोर सुमारे साडेचार कोटी खटले प्रलंबित आहेत. त्यापैकी सुमारे एक लाख प्रकरणे गेली ३० वर्षे न्यायालयाच्या फायलींमध्ये पडून आहेत. प्रकरणे निकाली निघायला दशके लागतात. या वेगाने २०४० पर्यंत १५ कोटी खटले न्यायालयांसमोर असतील आणि जनतेच्या सहनशीलतेची परिसीमा गाठली जाईल, ही समाज आणि न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत खेदाची बाब असेल.

आपल्या देशात न्यायालयांची मोठी कमतरता आहे. इतर आपत्कालीन सेवांप्रमाणेच न्यायालये सुरू करण्यासाठी न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांची संख्या किमान तिपटीने वाढवण्याची गरज आहे. न्यायाधीशांची कमतरता ही सर्वात मोठी समस्या आहे. सध्या देशातील न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची अंदाजे १९ हजार मंजूर पदे आहेत. त्यापैकी १८ हजार पदे कनिष्ठ न्यायालयांसाठी आहेत. गेल्या दशकात दाखल झालेल्या खटल्यांची संख्या बारापटींनी वाढली आहे, तर या काळात न्यायाधीशांची संख्या जेमतेम तिपटीने वाढली आहे आणि त्यातील किमान पंधरा टक्के पदे नेहमीच रिक्त राहतात. भारतात न्यायाधीशांची मंजूर संख्या प्रत्येक दशलक्ष लोकसंख्येमागे २१ इतकी आहे. त्यापैकी जवळपास ३० टक्के पदे रिक्त आहेत तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि न्यूझीलंडमध्ये ही संख्या ९० ते ११० पर्यंत आहे. कायदा आयोगाने आपल्या १२० व्या अहवालात न्यायाधीशांची संख्या प्रति दशलक्ष लोकसंख्येने ५० पर्यंत वाढवण्याची सूचना केली होती. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२००२) या खटल्यात सरकारला न्यायालयांची संख्या प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे किमान ५० पर्यंत वाढवण्याचे निर्देश दिले होते; परंतु गेल्या १२ वर्षांमध्ये त्यात कशी तरी २० पर्यंत वाढ झाली आहे.

कायद्यांची वाढती संख्या, किरकोळ वाद मिटवण्याबाबत कार्यकारिणीची उदासीनता, न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती, भ्रष्टाचार आणि इतर कारणांमुळे भारतात खटल्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. लोकसंख्या आणि न्यायालयांचे प्रमाण अत्यंत असंतुलित आहे. सेटलमेंट करारांसारख्या अनौपचारिक पद्धतींद्वारे प्रकरणांची संख्या लक्षणीयरीत्या कमी केली जाऊ शकते. यासाठी मध्यस्थी आणि सामंजस्य कायद्याची पुनर्रचना करण्यात आली आहे. दिवाणी आणि फौजदारी प्रक्रिया कायद्यात सुधारणा करून हे काम सोपे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लोकअदालतींनीही सर्वतोपरी प्रयत्न केले; परंतु खटल्यांच्या संख्येत फारसा फरक पडला नाही. अशा परिस्थितीत काही अपारंपारिक पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची गरज आहे. संसदेने २००८ मध्ये ग्राम न्यायालय कायदा मंजूर केला. तेथे किरकोळ दिवाणी व फौजदारी खटले निकाली काढण्यासाठी पंचायत स्तरावर न्यायालये स्थापन करण्याची तरतूद आहे. भारतात ग्राम न्यायालयांची प्रदीर्घ परंपरा आहे; पण राजस्थान आणि मध्य प्रदेश यासारखी काही राज्ये सोडली तर ती कुठेही सुरू झालेली नाहीत. आता सर्व प्रकारचे पूर्वग्रह बाजूला ठेवून ही व्यवस्था लागू करण्याची वेळ आली आहे. सुरुवात केली, की मार्गात येणारे अडथळे आपोआप नाहीसे होतात. जुलै २००६ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश सभरवाल यांनी न्यायालयांचे कामकाज दोन पाळ्यांमध्ये चालवण्याची सूचना केली होती. निवृत्त न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने हे साध्य करता येईल, असा त्यांचा विश्वास होता. गुजरातने या दिशेने पुढाकार घेतला आणि त्याचे चांगले परिणाम दिसून आले. अशा न्यायालयांना किरकोळ फौजदारी आणि दिवाणी खटल्यांचा निकाल देण्याचे अधिकार देऊन खटल्यांचे ओझे लक्षणीयरीत्या कमी केले जाऊ शकते. पायाभूत सुविधांसाठी मोठ्या भांडवलाची गरज भासणार नाही. भारत सरकारने तेविसाव्या कायदा आयोगाची स्थापना केली आहे. त्याला देशातील विविध कायद्यांचे परीक्षण करणे अनिवार्य आहे. हा नवीन आयोग भारतीय कायदेशीर चौकटीच्या सुधारणा आणि आधुनिकीकरणात, विशेषतः सामाजिक-आर्थिक न्याय, लैंगिक समानता आणि केंद्रीय कायद्याचे सरलीकरण या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नव्याने स्थापन झालेल्या विधी आयोगाला विद्यमान कायद्यांचे पुनरावलोकन करणे आणि त्यात सुधारणा करण्याची शिफारस करणे यासह विविध उद्दिष्टे सोपवण्यात आली आहेत. सध्याच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय संदर्भात कालबाह्य झालेले कायदे रद्द करण्याची शिफारस आयोग करेल. तेविसाव्या विधी आयोगाने सरकारी संस्था, नागरी समाज संस्था आणि कायदेशीर व्यावसायिकांसह विविध क्षेत्रातील भागधारकांशी संवाद साधून लवकरच आपले काम सुरू करणे अपेक्षित आहे. भारतातील भविष्यातील कायदेशीर सुधारणांना आकार देण्यासाठी त्याच्या शिफारशी महत्त्वाच्या ठरतील.

### आजकाल

# आपल्या अर्थव्यवस्थेचे नेमकं काय होतंय?

**विजय घोरपडे**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्ष पराभूत होऊन सत्ताबदल झाला असता तर हे गेली १० वर्षे राज्य करणारे सरकार जेलमध्ये असते काहो?

मित्रांनो! हा प्रश्न अशासाठी की काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीच असा दावा काश्मीरमधील एका जाहिर सभेत केला आहे की, ''इंडिया गठबंधन'' ला केवळ २२ जागा अधिक मिळाल्या असत्या तर हे सरकार आज जेलमध्ये असते.''असे खरगे यांचे वक्तव्य आहे! खरगेसारखे अनुभवी आणि नेमस्त नेते असे विधान जाहीरपणे करतात याला निश्चितच तसा या सरकारच्या अर्थ व्यवस्थेचा आणि त्यातील घोटाळे - गफलेबाजीचा आधार असणार! कारण आज विरोधी पक्षनेतेपदापासून ते अन्य काही समित्यांवर विरोधी पक्षनेते विराजमान झाले आहे व ते आज सरकारी फायली अधिकाराने पाहू शकतात.

सध्या एक न्यूज बर्या पैकी व्हायरल होतेय. भल्या भल्या नेत्यांनी, स्थापत्य विशारदांनी तथा आर्थिक तज्ज्ञांनी या देशासाठी ''विकासाचे मॉडेल'' ठरविलेल्या गुजरातमध्ये २०१७ ला ४४ कोटी रुपये खर्चून बांधलेला एक पूल आताच धोकादायक झाला व आता केवळ तो पाडण्यासाठीच ५२ कोटी रु. खर्च येणार असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. असाच प्रकार नैरोबी येथे घडला आहे. प्रधानमंत्री मोदी हे या देशाच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या या दौऱ्याने भारताचे संबंध किती घट्ट झाले हे कळलं नाही. पण या देशाशी गौतम अडानी व त्यांच्या ग्रुपचे संबंध चांगलेच घट्ट झाले हे गेल्या आठवड्यात समोर आले. तेथील एअरपोर्ट व अन्य काही बांधकामांची कंत्राटे अडानींना मिळाली. तेथील एका एअरपोर्टच्या रिपेरिंगचा खर्च अडानी यांनी १.८ बिलियन डॉलर्स लावला आणि प्रत्यक्षात ते एअरपोर्ट उभे करण्याचा खर्च होता १.३ बिलियन डॉलर्स! आता हा गफला तेथील जनतेच्या लक्षात येताच जनता रस्त्यावर आली. इकडे-तिकडे ह्याची - त्यांची 'घेराबंदी' सुरू झाली. सरकार, अडानी आणि मोदी यांच्या विरुध्द घोषणा सुरू झाल्या! नैरोबीसारख्या छोट्या देशाचीही जनता आज इतकी जागरूक आणि सक्रिय आहे! आणि आम्ही! बसलोय मोबाईल घेऊन!

सांगायचा मुद्दा असा की गेल्या १० वर्षात मोदी यांनी जेव्हढे म्हणून विदेश दौरे केले. जनतेचे अब्जावधी रुपये त्यावर खर्च झाले. देशाची शान वाढवली असा मिडीया प्रचार करतो . पण राहूल गांधी यांनी संसदेत ''मोदी-अडानी'' संबंधाचा प्रश्न उपस्थित केला तेंव्हापासून मोदी समवेत अडानी जात नाहीत इतकेच! बाकी व्यापार-धंदा-उद्योग यांचा अडानी विस्तार आजही चालूच आहे. आज ज्या काही ठराविक भारतीय कार्पोरेटसना विकसित देशांच्या बँका, अर्थसंस्था यांच्याकडून जी कर्जे मिळतात ती त्यांचे आर्थिक स्टेटस पाहून दिली जात नाहीत तर ती सरकारशी त्यांचे 'अर्थपूर्ण' संबंध लक्षात घेऊन दिली जातात. तसेच येथील स्वदेशी बँकांचेही आहे. म्हणून तर कार्पोरेटसना त्यांच्या कुवतीबाहेरची कर्जेही दिली जातात व कार्पोरेटसच्या गरजेनुसार ती माफीही केली जातात. कार्पोरेटचे १६ लाख कोटी कर्ज माफ केले गेले हे आज राहूल गांधी यांच्यामुळे घराघरात पोहचले आहे. यांच्या फाईली नव्या सरकारने उघडल्या तर खडगे जे म्हणतात ते निश्चितच घडू शकते. या मोदी सरकारने आपल्या आर्थिकनिती आणि त्याला पूरक अशा कायदे बदलाने खरंतर या देशाला व त्याच्या अर्थव्यवस्थेला पध्दतशीरपणे लुटले आहे. आणि मोदी महाराज ज्यांनी या देशाला व त्याच्या अर्थव्यवस्थेला जपलं त्या काँग्रेसला ''लुटारू'' म्हणून सर्वसामान्यांची दिशाभूल करत आहेत. आज अशी स्थिती आहे की ब्लॅक मनीही 'सिस्टिमद्वारे' मोठ्या प्रमाणात व्हाईट केला जात आहे. या देशात संविधानानुसार जी ''चेक अ‍ॅन्ड बॅलन्स''ची व्यवस्था होती तिच मोदींनी उध्वस्त केली आहे. जो एकेकाळी वॉच डॉग होता तो मिडीया आज ''प्रेजिंग डॉग'' झाला आहे. २४ तास सरकारची स्तुती करणारा झाला आहे. ग्रामीण विकास व स्वयंसेवी सामाजिक संस्था यांना काँग्रेस व अन्य पक्षांच्या सरकारांकडून (यात वाजपेयी यांचेही सरकार)... कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी फंड दिला जात होता. मोदींनी तो २०१४ नंतर सरळ रा.स्व.संघाच्या हवाली केला. आणि आज राहूल गांधी यांची तरूणांना एक वर्षाची अ‍ॅप्रेन्टीसशिप ही योजना उचलून ती हे कुबड्या धारी सरकार राबवणार आहे व त्यासाठी सरकारचा नव्हे तर या... फंडाचा पैसा खर्च करणार आहे. म्हणजे ''आयजीच्या जिवावर बायजी उदार''! देशातील ५००/१००० कंपन्या सांगितल्या गेल्या आहेत. हा फंड थोडा थोडका नाही. २०१७ ला या सी.एस.आर. फंडाची रक्कम १७ हजार कोटी होती.२०२२ मध्ये २६ हजार कोटी आणि २०२४ ला हि रक्कम आज ३० हजार कोटीहून अधिक आहे. लक्षात घ्या! या योजनेवर एकीकडे सरकार काही खर्चही करणार नाही पण श्रेय घेणार आणि दुसरीकडे चा पैसा पुन्हा कार्पोरेटच्याच हवाली करणार! याचा अर्थ सरकारची धोरणे कशी कार्पोरेटधार्जिणी आहेत हे लक्षात घ्या! मोदींच्या समाजकल्याण योजना या त्यांनी जागतिक बँक व जागतिक नाणेनिधीकडून जे १५५ लाख कोटी कर्ज उचलले त्यातून या योजना त्यांना स्वीकाराव्या लागल्या. पण देशात ढोल काय वाजवला जातो तर 'मोदी है तो मुमकिन है' चे नारे!

याच पध्दतीचा दुसरा मुद्दा म्हणजे इन्कमटॅक्सचा ! सामान्य उच्च मध्यम वर्गीय व्यक्ती वर्षाला ७ कोटी रुपये कमावत असेल तर त्याला ३ कोटी इन्कमटॅक्स द्यावा लागतो. पण कार्पोरेट वा बिझनेसमनची कमाई २० कोटी जरी असली तरी त्याला इन्कमटॅक्स म्हणून सरकारला केवळ ५० ते ८० लाख (पुरते १ कोटीही नाहीत) द्यावे लागतात. कृषी व्यवसायात तुमचे उत्पन्न अगदी ४० कोटी असले तरी नो इन्कमटॅक्स! म्हणून तर सर्व कार्पोरेटस कृषी पूरक धंद्याकडे वळले आहेत. कृषी व्यतिरिक्त कंपनीचे उत्पन्न या कृषी धंद्यात दाखवून ते राजरोसपणे टॅक्सचोरी करत आहेत. यावरून या नीच सरकारने तीन कृषी सुधारणा विधेयके का व कोणासाठी आणली होती त्याचे हे गणित समजून घ्या ! देश स्वतंत्र झाला तेंव्हा हा देश कृषीप्रधान आहे, त्याचे सर्वाधिक कमाईचे रिसोर्सेस या शेतीतच आहेत हे तत्कालीन सर्व पक्षांच्या नेत्यांनी मनोमन स्वीकारले होते व म्हणूनच पंडित नेहरू यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेची रचना जी कृषीप्रधान केली ती सर्वांनी स्वीकारली. तसेच रशियाच्या धर्तीवर जो 'नियोजन आयोग' १५ ऑगस्ट १९५० रोजी संसदेत ठराव करून मंजूर केला त्याचेही सहर्ष स्वागत केले. आणि २०१४ ला सत्तेवर आलेले मोदी यांनी या अर्थव्यवस्थेचे नेमके काय करत आणले आहे?

**(साभार)**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२० सप्टेंबर**

**१७००:-** शके १६२२ च्या अश्विन शुद्ध १ या दिवशी संत तुकोबा यांच्या विख्यात शिष्या बहिणाबाई यांचे निधन. तुकोबांच्या कृपेने स्वानुभावसंपन्न होऊन आत्मचरित्रपर व उपदेशपर अभंगही लिहिली. '**मत्स्य जैसा जळावाचूनी चरफडी । तैसचि आवडी तुकोबांची।**' यासारख्या अभंगातून याची प्रचिती येते. **१८९७ :-** दै. सकाळचे संस्थापक संपादक नानासाहेब परुळेकर यांचा जन्म. 'न्यूयॉर्क वर्ल्ड' मधून भारतसंबंधी लिखाण. १ जाने १९३२ मध्ये दै. सकाळची स्थापना. वृत्तपत्रसृष्टीला एक नवे वळण नानासाहेबांची दिले. तत्पूर्वी मराठी वृत्तपत्र केवळ भावना आणि देशप्रेम यांच्याभोवती फिरत होती. नानासाहेबांनी त्याला प्रोफेशनल टच दिला म्हणजे वृत्तपत्रातून अंडी आणि मासळीचे भाव द्यायला त्यांनीच सुरुवात केली. याशिवाय रस्त्याच्या कडेला बसलेला स्टोव्हवाला, भंगारवाला यांच्या मुलाखती छापून आल्या त्या सर्वधनम सकाळमध्येच. 'निरोष घेता' हे आत्मचरित्र प्रसिद. **१९१० :-** वेदांचे अभ्यासक, हातपाठी पंडित भालचंद्रशास्त्री वामन करंबळेकर यांचा जन्म. **१९१३ :-** कवी वामन रामचंद्र कात यांचा जन्म. सात एक नाटयकाव्ये आणि तीन कथा त्यांच्या नावावर आहेत. **१९१५ :-** संतकवी, प्रथकार गुलाबराव महाराज यांचे वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी निधन. अंध आणि अल्पायुषी असणाऱ्या गुलाबरावांनी अभंग, ओव्या, योग, वेदांत, वैद्यक, व्याकरण, आयुर्वेद, संगीत अशा विविध विषयांवर प्रचंड लेखन केले. **१९२२:-** शिक्षणतज्ज्ञ, चरित्रकार दत्तात्रय नरसिंह गोखले यांचा जन्म. त्यांनी लिहिलेल्या ज्ञानकोशकार केतकरांच्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. याशिवाय डॉ. पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन यांचे चरित्र तसेच हिंदूत्वदर्शन' हा ग्रंथ आणि 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर', 'स्वा. सावरकर : एक रहस्य', 'गांधीजी', 'मानव नि महामानव' ही पुस्तके तसेच अमेरिकन माध्यमिक शाळा' हा शैक्षणिक ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९२९:-** नामांकित वक्ता, फर्डा पत्रकार, नाटककार, 'काळ' पत्राचे संपादक शिवराम महादेव परांजपे यांचे निधन. त्यांच्या साहित्य संपदेत निबंध, नाटके, कथा, कादंबऱ्या आदींचा समावेश होतो. 'काळातील निवडक निबंध', 'साहित्यसंग्रह' या महत्त्वपूर्ण ग्रंथासह 'संगीत कादंबरी' हे नाटक, तसेच 'मानाजीराव', 'रामदेवराव', 'भीमराव' ही भाषांतरीत नाटके त्यांच्या नावावर आहेत. 'गोविंदाची गोष्ट', विंध्याचल' ह्या त्यांच्या उल्लेखनिय कादंबऱ्या. 'स्वराज्य' नावाचे साप्ताहिकही त्यांनी सुरु केले होते. 'सचित्र सुमनांजली' हा त्यांचा काव्यसंग्रही प्रसिध्द आहे. **१९३८ :-** कथा, कादंबरी लेखिका जयश्री मधुकर रुईकर यांचा जन्म. 'मृगजळ', 'अंर्तमन', 'सोबत', 'सत्कार' या कथासंग्रहासह 'वेदनेला आले', 'गोफ', 'जयपराजय' या कादंबऱ्या आणि 'स्वजातील विहीर' ही बालकादंबरी अशी साहित्य संपदा. **१९४३ :-** आपल्या साहित्यातून मराठयांच्या महाराष्ट्र बाहेरच्या कर्तृत्वावर प्रकाशझोत टाकणारे लेखक, इतिहास संशोधक शंकर पुरुषोत्तम जोशी यांचे निधन. अरबी पुश्तु, पर्शियन, रशियन आदी ग्रंथाचे जाणकार असलेल्या जोशी यांनी 'भाऊंच्या वीरकथा', 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार', 'शीखांच्या स्फूर्तिदायक इतिहास', 'राजस्थान - महाराष्ट्र संघर्ष' आदी पुस्तके लिहिलीत. **१९४७ :-** वयाच्या दहाव्या वर्षापासून लेखन करणाऱ्या वासंती गंगाधर इनामदार यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'अंतर्वेध' हे काव्य तसेच 'किनारा रित्या सागराचा', 'ती एक फुलणारी', पंख लाभले आभाळाला', 'सावलीतली उन्हे' या कादंबऱ्या. 'माझी बडबड गाणी' हे बालसाहित्य आणि 'सारे प्रवासी सौंदर्य तिमिराचे' ही कथा, अशी साहित्य संपदा. **१९४९ :-** संत माधवानंद मारोती बारसागडे यांचा जन्म. देवदर्शन शास्त्र', 'तत्वमसी महावाक्य बोध' हे अध्यात्मिक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९५३ :-** संत धर्मराव देवाजी आष्टीकर यांचा जन्म. 'विज्ञानश्वरी संदेशगीता' हा आध्यात्मिक ग्रंथ त्यांचा प्रसिध्द झाला आहे.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# आदिवासींना बदनाम करण्याचा कट

## ■ आमच्यावरील आरोप खपवून घेणार नाही : जैतू पारधी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील ताडवाडी येथील आदिवासी महिलांना गैरसमजुतीमधून बदनामी करण्याचा कट केला जात आहे. मात्र, त्यानंतर त्याच महिलांनी प्रसिद्धी माध्यमाच्या समोर बोलताना आम्हला कोणीही पैसे देण्याचे आमिष दाखवले नव्हते, अशी कबुली दिली. तर, आम्ही आदिवासी म्हणून कोणीही आमच्यावर आरोप करू नका, असा इशारा आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी यांनी दिला.**



कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायतीमधील ताडवाडी येथील आदिवासी समाजाच्या महिलांनी १५ सप्टेंबर रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर १६ सप्टेंबर याच महिलांचा आदिवासी नृत्याचा कार्यक्रम आमदार महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आदल्या दिवशी पक्ष प्रवेश करायला ठाकरे पक्षाने तुम्हाला काय दिले, असा प्रश्न काहींनी विचारला असता ठाकरे पक्षात प्रवेश करणारी आदिवासी महिला यांनी नितीन सावंत यांनी आम्हाला दीड लाख रुपये बचत गटाला देण्याचे कबूल केले आहे असे सांगितले आणि त्यानंतर शिवसेना पक्षाकडून त्या महिलेची व्हिडीओ व्हायरल करण्यात आली आणि शिवसेना ठाकरे पक्षावर आरोप करण्यात आले. त्यामुळे शिवसेना ठाकरे पक्षाचे पदाधिकारी यांनी सर्व माध्यमाच्या प्रतिनिधी यांना सोबत घेऊन ताडवाडी गाठले. तेथे ज्या आदिवासी महिलेने नितीन सावंत हे आमच्या बचत गटाच्या खात्यावर दीड लाख टाकणार आहेत असे जाहीर केले होते. त्याच आदिवासी महिलेने ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत तसेच अन्य पदाधिकारी आणि आदिवासी समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

ताडवाडीमध्ये त्याच आदिवासी महिलांनी दीड लाख रुपयांबद्दल खुलासा केला. आम्ही आमच्या स्वखुशीने नितीन सावंत यांच्या कार्यालयात गेलो आणि शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यानंतर आम्ही हसत-हसत बोललेली चर्चा याची व्हिडीओ बनविण्यात आली आणि त्यानंतर आमची बदनामी सुरु झाली. आम्ही आदिवासी असल्याने आमच्या राजकीय फायद्यासाठी चिखलफेक केली जात आहे, हे चुकीचे असल्याचे मत आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी यांनी केला आहे. मात्र, या प्रकारानंतर आदिवासी कार्यकर्त्यांचे प्रवेश घेताना राजकीय कसरत करावी लागणार असून, आगामी निवडणुकांमध्ये सर्व पक्ष काळजी घेतील, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.




# मोकाट गुरांबाबत प्रशासन उदासीन

**। कोर्लई । वार्ताहर ।**

गेल्या अनेक वर्षांपासून विशेष करून पावसाळ्यात संपूर्ण जिल्ह्यात तसेच मुरुड तालुक्यात रस्त्यावर विविध ठिकाणी मोकाट गुरांच्या त्रासाने प्रवासी व वाहनचालक त्रस्त आहेत. यावर ठोस उपाययोजना करण्यात प्रशासनाची हतबलता, उदासीनता दिसून येत असल्याने जनमानसातून नाराजीचा सूर दिसून येत आहे.

नगरपरिषद, ग्रामपंचायतीत पूर्वी असलेली कोंडवाडा संकल्पना कालबाह्य झाल्याने जिल्ह्यात तसेच मुरुड तालुक्यात अनेक रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी उनाड गुरांचा कळप, ठिय्या पाहावयास मिळतो. रस्त्यावर उनाड गुरांच्या त्रासाने दुचाकी, तीन चाकी वाहन चालकांना वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा व उपाययोजना ही काळाची गरज आहे. यासाठी संबंधित नगरपरिषद व ग्रामपंचायत प्रशासनाने जातीने लक्ष पुरवून रस्त्यांवरील उनाड गुरांच्या समस्येवर ठोस उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व जनमानसातून होत आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० सप्टेंबर

१) श्री. विलास दामोदर पाटील
वरसोली, २०-९-१९५५

२) श्री. दत्तात्रेय हरिश्चंद्र पोवळे
सारळ, २०-९-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. बळवंत शंकर कवळे , स्मरणार्थ, नवगाव, अलिबाग**

## सुरेश वाडेकर यांचे निधन

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंड्यातील चणे विक्रेते व्यावसायिक म्हणून प्रसिद्ध असलेले सुरेश अनाजी वाडेकर यांचे दि. १४ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. सदैव हसतमुख, अजातशत्रू म्हणून ओळख असलेले सुरेश वाडेकर यांचे अकस्मात निधनाने रेवदंडा शहरात सर्वांनीच हळहळ व्यक्त केली. त्यांच्या पश्चात पत्नी, रवींद्र, अमर ही दोन मुले, दोन सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रेवदंडा हरेश्वर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी हरेश्वर मंदिराजवळ दि. २३ सप्टेंबर रोजी होणार असून, उत्तरकार्य विधी दि. २६ सप्टेंबर रोजी त्यांच्या रेवदंडा निवासस्थानी होणार आहे.



## अनंत राऊत यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**



मोहोपाडा शिवनगर येथील अनंत परशुराम राऊत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून, मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार, दि.२० रोजी श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून, उत्तरकार्य सोमवार, दि.२३ सप्टेंबर रोजी शिवनगर येथील राहत्या घरी होणार आहे. त्यांच्या जाण्याने राऊत कुटुंबावर दुःखाचे सावट पसरले आहे.

## प्रकाश भोईर यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील देवकान्हे गावचे रहिवासी असणारे व सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शांताराम भोईर यांचे शुक्रवार, दि.१३ सप्टेंबर रोजी प्रदीर्घ आजाराने राहत्या घरी वयाच्या सुमारे ५५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहीण, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी रविवार, दि.२२ सप्टेंबर रोजी, तर अंतिम धार्मिकविधी मंगळवार, दि.२४ सप्टेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# हास्य कविसंमेलनाचे आयोजन

**। रसायनी । वार्ताहर ।**

मुंबई मराठी साहित्य संघ, गिरगाव (साहित्य शाखा) व सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल (कार्यक्षेत्र महाराष्ट्र)यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत निमंत्रितांच्या हास्य कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कविसंमेलनामध्ये नितीन वरणकार (शेगाव-बुलढाणा), प्रा. संजय कावरे (मंगरूळपीर-वाशिम), प्रवीण सोनोने (दारव्हा-यवतमाळ), प्रा. महादेव लुले (तिवसा-अकोला), अमोल चरडे (पुणे), प्रवीण बोपुलकर (पनवेल) हे कवी आपल्या कविता सादर करतील. याप्रसंगी 'महाराष्ट्राचा हास्य कवी स्पर्धा २०२४' या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रमसुद्धा संपन्न होणार आहे. कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्षा उषा तांबे, प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव, साहित्य शाखा कार्यवाह अशोक बेंडखळे, शब्दवेल साहित्य संघाचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर व सचिव अश्विनी अतकरे यांनी केले आहे. कविसंमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाचे केंद्रीय प्रसिध्दी प्रमुख रसायनी पनवेल येथील विलास पुंडले यांनी केले आहे.

# उरणमधील बांधकामांच्या चौकशीची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**



उरण पालिकेत कायदा धाब्यावर बसवून बांधकाम परवाने दिल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. या सर्व बांधकाम परवान्यांची फेरपडताळणी व बेकायदा बांधकामांच्या चौकशीची मागणी सामाजिक संघटनाकडून करण्यात आली आहे.

पालिकेत बांधकाम परवाना विभागामध्ये ऑनलाइन बांधकाम परवाने मंजूर करणे बंधनकारक आहे. परंतु, ऑफलाइन पद्धतीने बांधकाम परवाने मंजूर केल्याचे समजते. त्याची सखोल चौकशी होणे अपेक्षित असल्याचे पालिका वर्तुळात बोलले जाते. बांधकाम परवान्याशी संबंधित सर्व मूळ कागदपत्रे यांची सखोल चौकशी केली तर नक्कीच बोगस कागदपत्रांचा घोटाळा उघड होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. बांधकाम परवान्यांशी संबंधित असलेल्या या प्रकरणात पालिकेच्या काही निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांचा समावेश आहे, असे बोलले जात आहे. हे बांधकाम परवाने फेरपडताळणीत बेकायदेशीर आढळून आल्यास या सर्व संबंधितांसह मिळकतदार आणि कर्ज देणाऱ्या बँकाही अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

उरण शहरात नव्याने बांधकाम उभारण्यास परवानगी देताना खोटी कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पॉवर ऑफ ॲटनी संबंधित व्यक्ती मयत होऊनही जोडून दिली आहे. तसेच एफएसआय वाढवून मिळण्यासाठी रहदारीचा रस्ता व नालेही विकासकांच्या घशात घालण्याचे काम पालिका अधिकारी वर्गानी केल्याचे पालिका कर्मचाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर माहिती दिली. या मोठमोठ्या इमारतींना परवानगी देताना यापुढे त्याचे दुष्परिणाम काय होतील याचाही विचार केलेला दिसत नाही.

उरण नगरपरीषद हद्दीमध्ये दाटीने वर्दळ असलेल्या रस्त्यालगत सार्वजनिक गटारावर बांधकाम पार्कींग नाही, मुख्य रस्त्यापासून नियमाप्रमाणे कायद्याने बंधनकारक मार्जीन सोडलेले नाही. सेफ्टी झोनमध्ये नगरपरीषद हद्दीमध्ये विना परवानगीने इमारतींचे ४ ते ५ मजली इमारतींची बांधकामे उभी राहात आहेत.

बांधकाम विभागातील अधिकारी वर्गाच्या चौकशीची लेखी मागणी करूनही याकडे दुर्लक्ष करून सदर अधिकारी निवृत्त होऊनही आजही नगरपालिका कार्यालयात दररोज अधिकारी वर्गांच्या केबिनमध्ये बसून ढवळाढवळ करीत असल्याची चर्चा आहे.

शहराच्या मध्यवस्तीतील, मोक्याच्या बाजारपेठेत अलीकडे समोरील जागा सोडून बांधकामे न करता झालेली बांधकामे समोरील जागेवरही केली गेली असल्याचे दिसत आहे. परंतु ही रस्त्यावर खेटून उभारलेली बांधकामे पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पाडली गेली नाहीत. त्याचीही पालिका आयुक्तांनी चौकशी करावी. यात दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करावी आणि संबंधित बेकायदा बांधकामे पाडून बाजारपेठेचा श्वास मोकळा करावा, अशीही मागणी होत आहे. अन्यथा याविरोधात सामाजिक संघटना जनहित याचिका दाखल करून कारवाईची मागणी करणार असल्याचे समजते.

# जिल्ह्यात होणार डाक अदालत

**। सारळ । वार्ताहर ।**

डाक विभागाच्या ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी डाक विभागाकडून विविध पातळीवर (डिव्हिजन, रिजन, राज्य) शुक्रवार, दि. २० सप्टेंबर रोजी जिल्हा अधीक्षक रायगड डाक विभाग यांच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तर, रिजनमधील पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई यांनी दि. २७ सप्टेंबर रोजी ११ वाजता पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय, दुसरा माळा, पनवेल मुख्य पोस्ट ऑफिस इमारत नवीन पनवेल येथे व राज्य पातळीवरील डाक अदालत मुख्य पोस्ट मास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, अनेक्स बिल्डिंग, जीपीओ पाचवा माळा, मुंबई येथे २५ सप्टेंबर रोजी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या डाक अदालतीचा हेतू ग्राहकांच्या समस्या वेगवान व प्रभावी रीतीने विनाविलंब सोडवणे हा आहे. या डाक अदालतीमधून डाक विभागाच्या ग्राहकांच्या असणाऱ्या समस्यांवर, तक्रारींवर जागेवरच निर्णय घेऊन तोडगा काढण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. यामध्ये स्पीड, रजिस्टर, पार्सल या तक्रारीचे सहा आठवड्यांपेक्षा जास्त दिवस असलेले प्रलंबित तक्रारीचे निवारण केले जाणार आहे.

यात फक्त न्यायालयात असणारी, कायदेशीर प्रलंबित असणारी प्रकरणे या अदालतीमध्ये समाविष्ट करता येऊ शकत नाहीत. दि २० सप्टेंबरपर्यंत कागदपत्रसह आलेल्या तक्रारींचा या डाक अदालतमध्ये समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी. संबंधित प्रकरणावर तक्रारदारांनी या आदलतीमध्ये कागदपत्रासह येऊन याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी केले आहे.




**पनवेलच्या उरण नाक्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सकाळच्या वेळेत कामावर निघालेल्या नागरिकांना या वाहतूक कोंडीत अडकल्याने ऑफिसमध्ये वेळेवर पोहोचता येत नाही. ही वाहतूक कोंडी दररोजचीच असल्याची ओरड नागरिक करीत असून, यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)**

# मतिमंद मुलांना शैक्षणिक साहित्य, खाऊचे वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**




रसायनी चावणे गावचे भूमीपुत्र, समाजसेवक, एस.पी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्याचे संस्थापक-अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या मार्गदर्शनाने जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्राचे रायगड जिल्हा प्रमुख, एस.पी. कन्स्ट्रक्शनचे मालक आणि एस. पी. फिटनेसचे सर्वेसर्वा युवा उद्योजक सचिन यशवंत पाटील यांचा वाढदिवस दरवर्षी वेगवेगळे सामाजिक उपक्रम हाती घेऊन साजरा केला जातो. यावर्षी ही मुरबाड येथील तारांगण मतिमंद अनाथ आश्रम येथे कुटुंबासोबत जाऊन त्या मतिमंद मुलांसोबत स्नेहभोजनाचा आनंद घेतला. तसेच त्यांना कपडे, वह्या, शालेय बॅग, खाऊ, नेलकटर, रंगीत खडू, पेन्सिल, शॉपणार, कंगवा असे उपयोगी सामान दिले. असा आगळावेगळा कार्यक्रम करून त्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित केला. यावेळी सचिन पाटील, फाऊंडेशनचे सचिव वैभव सुभाष विशे, सदस्य प्रशांत पाटील, शिल्पा विशे, प्रियंका पाटील, सान्वी पाटील व शाळेचे व्यवस्थापक विकास म्हारसे व त्यांचा स्टाप उपस्थित होता.

# पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**। कोलाड । वार्ताहर ।**

कै. गुरुवर्य पट्टे तुकाराम वस्तात यांच्या ३३ व्या पुण्यस्थितीनिमित्त शनिवार, दि.२१ सप्टेंबर रोजी वरसगाव पद्मावती नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमानिमित्त सकाळी ९ वाजता सत्यनारायणाची महापूजा, सकाळी ११ वाजता कै. तुकाराम वस्तात यांचे जीवनचरित्र वर्णन पुरोहित महेश जंगम यांच्या हस्ते, दुपारी १२ वा. शक्तीवाले शाहीर संतोष कांबळे जाखमाता मायावती शिवशक्ती नाच मंडळ शिस्ते ता. श्रीवर्धन विरुद्ध तुरेवाले शाहीर वसंत भोईर (रायगडभूषण) वीर हनुमान नाच मंडळ, तिसे, ता. रोहा यांच्या नाचाचा जंगी सामना आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनंत आंब्रुस्कर, सुरेश आंब्रुस्कर, अजित आंब्रुस्कर, अमर आंब्रुस्कर, ग्रामस्थ मंडळ वरसगाव पद्मावती नगर, सापया वरसगाव क्रीडा मंडळ, गावठाण, श्री गणराज मित्रमंडळ, सापया क्रीडा मंडळ, तरुण वर्ग व महिला मंडळ वरसगाव मेहनत घेत आहेत.

# अवैध धंद्यांविरोधात स्वराज पक्ष आक्रमक

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नेरुळ पूर्व आणि पश्चिम रेल्वे परिसरात मद्यपी आणि अवैध धंद्यांनी अतिरेक केला असून, याविरोधात स्वराज पक्ष आक्रमक झाला आहे. सदर मद्यपी आणि अवैध धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र, आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने आता जागरूक नागरिकांच्या सहकार्याने स्वाक्षरी मोहीम दि. १९ आणि २० सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत रेल्वे परिसरात राबविण्यात येणार असल्याचे स्वराज पक्ष, नवी मुंबई उपाध्यक्ष स्वप्निल घोलप यांनी सांगितले.

नेरुळ पूर्व आणि पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात दिवस-रात्र मद्यपी यांनी थैमान घातले आहे. दारू पिऊन शिवीगाळ, मारामारी आणि महिलांची छेडछाड असे प्रकार नियमित घडत आहेत. या रेल्वे स्थानकाजवळ सायंकाळी मद्यपी दारूच्या दुकानातून दारू विकत घेऊन जवळच असलेल्या पार्किंगमध्ये रेल्वे परिसर भिंत आदी ठिकाणी खुलेआम मद्यप्राशन करतात. त्याचबरोबर या ठिकाणी गर्दुल्ले व अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचा वावर वाढत असल्याने येथून जाणाऱ्या महिला व शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

या प्रकाराला आळा बसावा यासाठी स्वराज पक्ष मागील दीड वर्षांपासून स्थानिक पोलीस, सिडको आणि रेल्वे प्रशासन यांच्याकडे पत्रव्यवहार करत आहे. तसेच पोलीस चौकी निर्माण करण्याची मागणीदेखील केली आहे. मात्र, परिस्थिती जैसे थे आहे. आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने स्वाक्षरी मोहीम दि. १९ आणि २० सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत रेल्वे परिसरात राबविण्यात येणार आहे. सह्यांचे निवेदन आम्ही नवी मुंबई पोलीस आयुक्तांना देणार असून, पुढील आठ दिवसांत प्रश्न सुटला नाही तर आंदोलन करण्याचा इशारा स्वप्नील घोलप यांनी दिला आहे.

# हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त परिसंवाद

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी स्थापन केलेल्या राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सत्याग्रह महाविद्यालयात हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वेळात शांताबाई रामराव सभागृह, सत्याग्रह कॉलेज, सेक्टर-७, खारघर, नवी मुंबई येथे एका राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे निमंत्रक प्रा.डॉ. जी.के. डोंगरगावकर यांनी सांगितले.

मुंबई महानगर प्रदेशाचा भविष्यकालीन विकास तथा विकसित भारताच्या संकल्पपूर्तीसाठीचे मनुष्यबळ : संधी, आव्हाने आणि डावपेच या विषयावर परिसंवाद होणार आहे. परिसंवादाचे उद्घाटन पूज्य भदंन्त डॉ. उपगुप्त महाथेरो करणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जे.पी. डांगे (माजी मुख्य सचिव महाराष्ट्र शासन), आर.के. गायकवाड (माजी आयुक्त समाजकल्याण महाराष्ट्र राज्य) यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या परिसंवादात प्रा. व्यंकट माने, डॉ. प्रज्ञा डोंगरगावकर, डॉ. प्रतिभा कांबळे, डॉ. प्रवीण सूर्यवंशी, ॲड. अजिंक्य शाक्य, प्रा. प्रियंका गायकवाड, डॉ. अनिल पांडे, डॉ. वाय. के. ठोंबरे, प्रा. मिलिंद ठोकळे, प्रा. रमेश सोनकांबळे, डॉ.प्रा. विजय मोरे सहभागी होणार आहेत.

## पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांचे प्रतिपादन

# मुलींसाठी लाठी प्रशिक्षण काळाची गरज

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**महाराष्ट्रात अल्पवयीन मुलींवर वाढते अत्याचार ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. मुलींनी आता स्वसंरक्षण करणे, ही आता काळाची गरज आहे. श्रीवर्धन येथे आता महानगर गॅस लिमिटेड, सेवा सहयोग फाऊंडेशन अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी लाठी प्रशिक्षण सुरू होत आहे व दोनशे चार मुलींनी लाठी प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी केली आहे, याचा आनंद होतोय, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांनी केले आहे.**




किशोरी विकास प्रकल्प विभाग श्रीवर्धन आयोजित किशोरवयीन मुलींसाठी दर रविवारी लाठी प्रशिक्षण सुरू होत असून, नगरपरिषद शाळा क्रमांक एक येथे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या हस्ते प्रशिक्षण वर्गाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. यावेळी सेवा सहयोग केंद्र श्रीवर्धन विभागाचे सुयोग चौगुले, समाजसेविका प्रवीता माने, राजेंद्र वाणी, विजय येलवे आणि शिवरुद्र अकॅडमीचे प्रशिक्षक शैलेश ठाकूर उपस्थित होते. यावेळी शैलेश ठाकूर, प्रवीता माने, सुयोग चौगुले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्रीवर्धन समन्वयक अपर्णा बंदरकर यांनी केली, तर आभारप्रदर्शन वैशाली सावंत यांनी केले. यावेळी किशोरी विकास प्रकल्प श्रीवर्धन विभागाच्या सुप्रिया करंजकर, आरती नेवरेकर उपस्थित होत्या.

### सोशल मीडियापासून दूर राहा

**मुलींनी सोशल मीडियापासून चार हात दूर राहावे, अनोळखी व्यक्तीशी मैत्री टाळावी, गुड टच-बॅड टच ओळखावे, तसेच अनोळखी व्यक्तींनी दिलेले पेय टाळावे, पेयात गुंगीचे औषध असू शकते. मुलींनी मेहनत करावी, यश मिळवावे, आईवडिलांचे नाव उज्वल करावे, परंतु शॉर्टकटने भविष्य घडवू नका. लाठी प्रशिक्षण आता काळाची गरज झाली आहे. संरक्षण हे आताच्या युगात गरजेचे आहे, असा सल्ला रिकामे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना दिला.**

# करोडोंची पाणीयोजना रामभरोसे

## तळा शहराचा पाणीप्रश्न रेंगाळला



। तळा । वार्ताहर ।

**महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत तळा शहरासाठी १३ कोटी ७० लाख रुपये खर्चाची नवीन पाणी योजना मंजूर झाली. या योजनेचे भूमीपूजन दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडले. या भूमीपूजनास राष्ट्रवादी, भाजपा, शिवसेना पक्षातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. आज या सोहळ्याला आठ महिन्यांचा कालावधी लोटून गेला; परंतु अजूनही या योजनेला गती आलेली नाही. काम कासव गतीने सुरू आहे. प्रशासन कंत्राटदाराला जावयाप्रमाणे वागणूक देते, असा आरोप जनतेतून होऊ लागला आहे. अशा धीम्या गतीने काम सुरू राहिल्यास तळा शहर पाणीपुरवठ्याची योजना कधी यशस्वी होणार, असा सवाल करत जनतेने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि प्रशासनास लक्ष केले आहे.**

### पाणीसमस्येमुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर

उन्हाळा असो, पावसाळा असो की हिवाळा, तळा शहरवासियांना बाराही महिने पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. नगरपंचायतीच्या ताब्यात येथील पाणीपुरवठा गेला आणि दुर्दैवाचा फेरा सुरू झाला. गेल्या वीस-बावीस वर्षांपासून एक दिवसाआड पाणी मिळते. उन्हाळ्यात दरवर्षी पाण्याच्या नावाने बोंबच असते. विशेष म्हणजे, पाणीपट्टी वाढवून कुठल्याच प्रकारच्या सुविधा नागरिकांना दिलेल्या नाहीत. आजही काही परिसरातील भागात तीन-चार दिवसांनंतर पाणी आले, पण ते पुरेसे नाही आणि विशेष म्हणजे तीन-चार दिवसांची साठवण करणे अवघड आहे.

- **योजनेचे काम कूर्मगतीने सुरूच**
- **कंत्राटदाराला जावयाप्रमाणे वागणूक**

तळा शहरासाठी वावे धरणातून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत तेरा कोटी सत्तर लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या कामाचे कंत्राट वैष्णवी कन्स्ट्रक्शन बारामती पुणे या कंपनीला दिले आहे. मार्च २०२४ रोजी काम सुरू कण्याचे आदेश या कंपनीला शासनाकडून देण्यात आले; परंतु सध्या हे काम रामभरोसे आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा आहे. त्यातील आठ महिने निघून गेले. जेव्हा कंत्राटदाराच्या मनात येते, तेव्हा तो काम सुरू करतो. हे काम करत असताना कोणते नियोजन, मोजमाप न करता मनमानी पद्धतीने काम केले जात आहे, असा आरोप करण्यात येत आहे. नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाचा इंजिनियर या ठिकाणी फिरकत नसल्यामुळे ही योजना यशस्वी झालेली नाही, असेही बोलले जात आहे. या योजनेचे काम धीम्या गतीने सुरू आहे. केवळ विहीर बांधण्यासाठी इतकी दिरंगाई होत असेल, तर उर्वरित शहरातील काम कधी पूर्ण करणार? असेच काम होणार का, याबाबतीत सविस्तर माहिती सत्ताधारी आणि प्रशासनाने द्यावी अशी मागणी जनतेकडून केली जात आहे.

नगरपंचायतीत विरोधी पक्ष नसल्याने प्रशासन सुस्त झाले आहे. ठेकेदारावर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचा अंकुश नसल्याने नगरपंचायतीने रस्त्यासाठी खर्च केलेले ५५ लाख रुपये ज्याप्रमाणे पाण्यात गेले, त्याचप्रमाणे १३ कोटीदेखील पाण्यात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही योजना फक्त पाणी अडवा पैसे जिरवा यासाठीच आहे की काय? अशी शंका तळावासीय व्यक्त करत आहेत.

पाणीसमस्या असल्यामुळे शासकीय, निमशासकीय अधिकारी यामध्ये शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, इतर कर्मचारी इंदापूर माणगावसारख्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. या सर्व चाकरमान्यांची आर्थिक उलाढाल इतर तालुक्यात होत असल्याने तळा बाजारपेठेवर त्याचा मोठा फटका बसत आहे. नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता येऊन अडीच वर्षांचा कालावधी लोटला; परंतु शहराचा पाणीप्रश्न अजून रेंगाळला असल्याने जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे.

### कामांबाबत नाराजी

**रायगड जिल्ह्यात पाण्याच्या अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र, प्रत्यक्षात जिल्ह्यातील नागरिकांना पाण्यासाठी आजही वणवण करावी लागत आहे. तळा शहरासाठी नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन पाणी योजना सुरू करण्यात आली आहे. परंतु, या योजनेच्या कामाबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केल्याचे चित्र दिसून येत आहे.**



● माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनातून व शेकाप पनवेल मनपा जिल्हा चिटणीस गणेश कडू यांच्या संकल्पनेतून गणेश विसर्जनाच्या दिवशी आदर्श हॉटेल चौक येथे भाविकांना पाणी व शीतपेय वाटप करण्यात आले. यावेळी शेकाप पनवेल शहर चिटणीस नंदकिशोर भोईर, पनवेलच्या माजी नगराध्यक्ष अनुराधा ठोकळ, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, पनवेल अर्बन बँकेचे माजी संचालक अनिल जाधव, नरेश मुंढे आदी मान्यवर. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# स्टॅम्पसाठी टेकडीवर जाण्याचे कष्ट थांबले

### प्रशासकीय भवनाजवळच स्टॅम्प व्हेंडरचे स्टॉल्स



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत येथील तहसील कार्यालय आणि प्रांताधिकारी कार्यालय हे मेअखेरीस नवीन प्रशासकीय भवन येथे आले. मात्र, त्यानंतरदेखील तीन महिने कर्जत तालुक्यातील जनतेला शासकीय कामासाठी लागणारे मुद्रांक पेपर खरेदी करण्यासाठी जुने तहसील कार्यालय असलेल्या टेकडीवर जावे लागत होते. त्याबद्दल सर्व माध्यमांनी आवाज उठवल्यावर आता प्रशासकीय भवनाजवळ स्टॅम्प व्हेंडर यांचे स्टॉल्स सुरू झाले आहेत. दरम्यान, प्रशासकीय भवनासमोरील शासकीय जागेत स्टॅम्प व्हेंडर स्टॉल्स बांधण्यात आले आहेत.

कर्जत शहरात नवीन प्रशासकीय भवन उभे राहिले असून, या कार्यालयाशी संबंधित असलेले मुद्रांक पेपर विकत घेण्यासाठी कर्जत तालुक्यातील जनतेला जुन्या तहसील कार्यालयात जावे लागत होते. मे २०२४ अखेरीस कर्जत प्रशासकीय भवनमधून प्रांत अधिकारी आणि तहसील कार्यालय सुरू झाली. जुन्या तहसील कार्यालयाच्या रेकॉर्ड रूमसमोर मुद्रांक विक्रेते यांचे स्टॉल्स आहेत. मात्र, नवीन प्रशासकीय भवनमध्ये मुद्रांक विक्रेत्यांना जागा देण्यात आली नव्हती. त्यामुळे शालेय कामासाठी आवश्यक असलेले दाखले मिळविण्यासाठी कर्जत तालुक्यातील जनतेची पुरती दमछाक झाली होती. तीन महिने शालेय विद्यार्थी, त्यांचे पालक हे जुनी कचेरी नवीन प्रशासकीय भवन अशा येरझऱ्या मारत होते. मात्र, प्रशासकीय भवनमध्ये किंवा समोर काही जागा उपलब्ध करून दिली जात नव्हती. मुद्रांक विक्रेते यांनी जिल्हा मुद्रांक अधिकारी यांच्याशी संपर्क साधून कर्जत प्रशासकीय भवनमध्ये जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

### लोधिवली ग्रुप ग्रामपंचायतकडून

# प्रधानमंत्री आवास घरकुल वितरण



● (छायाचित्र : राकेश खराडे)

। रसायनी । वार्ताहर ।

पंतप्रधान भारत सरकार यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेचा शुभारंभ झाला आहे. ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली यांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पूर्णत्वास आणि मंजुरी मिळाली त्यांना ई-प्रणाली माध्यमातून घरकुलांचे वाटप करण्यात आले.

पंतप्रधान आवास योजना नियम व अटीनुसार घर नसलेल्या किंवा गरीब परिस्थितीत राहणाऱ्या कुटुंबांना मदत करण्यासाठी सरकारने सन २०१६ मध्ये एक कार्यक्रम सुरू केला. ग्रामीण भागातील या कुटुंबांसाठी मूलभूत गरजा असलेली घरे बांधण्याचे उद्दिष्ट नक्की करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत २ कोटी घरे बांधली आहेत, जे २.७२ कोटी घरांच्या ठरलेल्या उद्दिष्टाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे ग्रामीण टप्पा दोन व अंतर्गत घरकुलांना मंजुरी मिळाली, त्यांना पहिला हप्ता वितरण करण्यात आला तर पूर्ण झालेल्या घरकुलांची ई-चावी देण्याचा घरकुलांच्या ई-गृहप्रवेश कार्यक्रम ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत लोधिवली कार्यालयात संपन्न झाला. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे, सुशीला भुईकोट, भारती चाळके, मंगल वाघमारे, निखिल पाटील व ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हार, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत, लाभार्थी विष्णू पवार, मारुती पवार, मंगल मोरे, विमल वाघमारे यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

# भेंडखळ येथे जरीमरी आईचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

। उरण । वार्ताहर ।

भेंडखळ ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या जरीमरी आईच्या मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व जीर्णोद्धार सोहळा सोमवारी (दि. १६) मोठ्या भक्तिभावाने गावकऱ्यांच्या उपस्थित पार पडला.

या सोहळ्याचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी, गावकऱ्यांनी सहभाग घेऊन जरीमरी आईच्या मूर्तींचे दर्शन घेतले. यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत, मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, तसेच इतर मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शविली होती.



मंदिर जीर्णोद्धार कमिटीचे अध्यक्ष काशिनाथ घरत, उपाध्यक्ष किरण पाटील, उपाध्यक्ष मंजिता पाटील, सेक्रेटरी सूरज ठाकूर, खजिनदार विजय ठाकूर, रेखा ठाकूर, अशोक ठाकूर, शिवाजी ठाकूर यांच्यासह जीर्णोद्धार कमिटीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांनी मान्यवरांचे स्वागत केले.

# वृद्धाश्रमात भोजनदान, फळांचे वाटप

। पाली । वार्ताहर ।

ईद-ए-मिलादुनबीच्या पवित्र दिनानिमित्तमुस्लिमसोसायटीडेव्हलपमेंट ग्रुप पाली आणि नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री समर्थ वृद्धाश्रम, परहूर, अलिबाग येथे विशेष समाजकार्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम विशेषतः या दिवशी मानवतेसाठी पैगंबर हजरत मोहम्मद (स.) यांनी दिलेला संदेश पसरवण्यासाठी करण्यात आला. या पवित्र हदीसच्या आधारे वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना जेवण देण्यात आले. तसेच फळांचे वाटप करण्यात आले. केवळ अन्नदानच नव्हे, तर त्यांच्यासोबत वेळ घालवून त्यांचे अनुभव ऐकण्याचे महत्त्वाचे कार्य केले गेले.

# बेकरे येथील सिमेंट बंधाऱ्याचा सांडवा फुटला



- **बेकरे गावाला पाणी टंचाईचा धोका**
- **बंधारा दुरूस्त करण्याची मागणी**

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कर्जत-नेरळ-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील बेकरे पुलाच्या वरच्या भागात असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे सांडवा जोरदार पावसाने फुटला आहे. त्या सांडव्यामुळे भविष्यात बेकरे गावातील पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

कर्जत-कल्याण रस्त्यावर बेकरे गावाच्या जवळ पुलावर सिमेंट बंधारा बांधण्यात आला. त्या ठिकाणी पाली-भूतीवली लघुपाटबंधारे प्रकल्प असून, त्या धरणाच्या पाझर तलावातील पाणी याच बेकरे पुलाच्या खालून वाहणाऱ्या नाल्यातून वाहून जात असते. त्यावेळी स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनंतर सिमेंट बंधारा बांधण्यात आला. त्या बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या पाण्याचा उपयोग त्या भागातील नळपाणी योजना अवलंबून आहेत. त्याचवेळी त्या ठिकाणी असलेल्या गणेश घाट येथे धार्मिक विधी होत असतात. त्यासाठी पाण्याचा उपयोग महत्त्वाचा असतो. गेल्या काही वर्षात त्या सिमेंट बंधारा हा महत्त्वाचा ठरला आहे.परंतु, मागील महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आणि त्या पावसाच्या पाण्याने सिमेंट बंधारा ओसंडून वाहत होता. मात्र, पडणारा पाऊस हा थांबत नव्हता आणि शेवटी सिमेंट बंधाऱ्याचे सांडवा हा सिमेंटचा असूनदेखील फुटला आहे. त्यामुळे भविष्यात त्या भागात पाण्याचा साठा कमी होणार आहे.

बेकरे पुलाच्या वरच्या भागात असलेल्या सिमेंट बंधारा येथे तेथील पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजना यांचे उद्भव आहेत. त्या फुटलेल्या सांडल्यामुळे सिमेंट बंधाऱ्याचा पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजना पाणी कमी होणार आहे. सांडवा फुटल्याने पाटबंधारे खात्याने त्या बंधाऱ्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

# हरवलेल्या मुलीला पालकांकडे सुपूर्द

। उरण । वार्ताहर ।

कोप्रोली येथील भरकादेवी आईस्क्रीम पार्लर दुकानात हरवलेल्या स्थितीत आढळून आलेल्या एका चिमुकल्या मुलीला कोप्रोली गावातील सामाजिक कार्यकर्ते निर्भय म्हात्रे यांनी वडिलांच्या स्वाधीन केले.

कोप्रोली नाक्यावरील भरकादेवी आईस्क्रीम पार्लर या दुकानात एक चिमुकली दोन ते तीन तास सैरभैर अवस्थेत, रडत बुधवारी (दि. १८) दुकानदाराला आढळून आली. या दुकानदाराने घटनेचे गांभीर्य ओळखून कोप्रोली गावातील सामाजिक कार्यकर्ते निर्भय म्हात्रे यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. निर्भय म्हात्रे यांनी चिमुकल्या मुलीला विचारणा केली असता ती फक्त पप्पा, मम्मीपलीकडे कोणत्याही प्रकारचे शब्द उच्चारत नव्हती. दुकानदार व निर्भय म्हात्रे यांनी कोणाची मुलगी हरवली आहे का, असा मेसेज आपल्या सहकाऱ्यांना दिला. यावेळी कोप्रोली गावातील भाडोत्री रहिवाशांची मुलगी हरवली असल्याचे दिसून आले.निर्भय म्हात्रे यांनी त्या चिमुकल्या मुलीला आईस्क्रीम खाऊ घालून तिच्या वडिलांच्या स्वाधीन केले.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.
- **घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे.** ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४
- **रिसॉर्ट वर कामासाठी जोडपं पाहिजे** आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण- सासवणे.
- **अलिबागमधील नामांकीत** मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : 9823492626/7998619191
- **LIC Office** विजयनगर वरसोली येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क :७५०७९२९१२८/९४२२४९४५९०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# गोवठणे शाळेला कॉम्प्युटर भेट

। उरण । वार्ताहर ।

इंडियन ऑइल अदानी वेंचर नवघर टर्मिनल यांच्या सीआरएस फंडातून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोवठणेसाठी चार कॉम्प्युटर, दोन लॅपटॉप, एक प्रिंटर, एक झेरॉक्स मशीन आणि दोन टेबल गोवठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रणिता म्हात्रे व शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना म्हात्रे यांच्या उपस्थितीत देण्यात आल्या.



रायगड जिल्हा परिषद शाळा गोवठणे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी इंडियन ऑइल अदानी टर्मिनलचे सीओओ अतुल खराटे यांनी सांगितले की, आपण ग्रामीण भागातील मुलांना आणि आदिवासी मुलांचे देणे लागतो, मुंबईच्या बाहेर पण जग आहे त्याची जाणीव ठेवून इंडियन ऑइल आणि अदानी टर्मिनल्सच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच यापुढेही इंडियन ऑइलच्या माध्यमातून परिसरातील शाळांसाठी भरीव कामगिरी करण्याचा संकल्प असून, ग्रामीण भागातील मुलांना सहकार्य आणि शैक्षणिक मदत केल्याच्या आनंद अशा सामाजिक उपक्रमातून प्राप्त होत आहे. तरी ग्रामीण भागातील मुलांनी अभ्यासाची कास धरून मोठ्या पदावर जाण्याचे स्वप्न पाहणे गरजेचे असल्याचे मत शेवटी अतुल कराटे यांनी व्यक्त केले.

यावेळी गोवठणे गावच्या सरपंच प्रणिता म्हात्रे, इंडियन ऑइल अदानी टर्मिनल्सचे वरिष्ठ अधिकारी अतुल खराटे, नवघर टर्मिनलचे भुपेश शर्मा, डीजीएम नीरज मनीक्कम, ओपेशन मॅनेजर सतीश म्हात्रे, संदीप काळे, प्रफुल्ल म्हात्रे, परमानंद पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, निर्णय पाटील, अर्पिता म्हात्रे, सारिका म्हात्रे, संगीता म्हात्रे, शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना म्हात्रे, शिक्षक नेते निर्भय म्हात्रे, च.वी. म्हात्रे, ग्रामसेविका उर्मिला पाटील, प्रशासन अधिकारी काळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्भय म्हात्रे यांनी करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

### रोगराईला आळा, पर्यावरण संवर्धनास मदत

# गिधाड संवर्धनासाठी रेस्टॉरंट

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

आपल्याला माणसांसाठी असणारे रेस्टॉरंट माहिती आहे. मात्र, गिधाडांसाठी रेस्टॉरंट कधी ऐकले आहे का? हो! रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्यात चक्क गिधाडांसाठी एक रेस्टॉरंट आहे.

ग्रीन वर्कस् ट्रस्ट ही बिगर शासकीय संस्था मागील काही वर्षे फणसाड वन्यजीव अभयारण्यामध्ये निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन व जनजागृती या विषयांवर कार्यरत आहे. फणसाड अभयारण्यात वनखात्याच्या माध्यमातुन व्हल्चर रेस्टॉरंट (गिधाड आहार केंद्र) हे गिधाडांच्या संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठिकाण उभारले आहे. साल २०१४ मध्ये याठिकाणी २०-२५ गिधाडे पाहण्यात आली होती. मात्र, त्यानंतर या ठिकाणी गिधाडे पाहण्यात आली नाहीत. त्यामुळे या गिधाड रेस्टॉरंटचा मुख्य उद्देश, गिधाडांना या ठिकाणी आकृष्ट करणे हा आहे. यामुळे फणसाड अभयारण्यात गिधाडांचे पुनरुज्जीवन व संवर्धन होऊन त्यांच्यावर संशोधन देखील होईल.

सदर गिधाड रेस्टॉरंटचे कामकाज आणि त्याबाबत जनजागृती करण्याचे काम हे ग्रीन वर्कस् ट्रस्ट आणि एस.बी.आय. फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झाले आहे. या कार्यास महाराष्ट्र वनविभाग (ठाणे, वन्यजीव) यांचे मोलाचे सहकार्य व सहाय्य त्यांना लाभत आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार गिधाड हा पक्षी 'अनुसूची एक'मध्ये समाविष्ट आहे. तरी, त्यांच्या संवर्धनासाठी त्यांना नियमित अन्नपुरवठा मिळावा या हेतूने गिधाड आहार केंद्रात जनावरांचे मृतदेह पुरवण्याचे काम या प्रकल्पात हाती घेतले आहे.




### कार्यशाळेचे आयोजन

**रायगड पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य यांची पशुगणनेसंदर्भातील कार्यशाळा पनवेल येथे संपन्न झाली. यामध्ये ग्रीन वर्कस् ट्रस्टने उपस्थितांना प्रकल्पासंदर्भात माहिती दिली व त्यांना मदतीचे आवाहन केले. सदर कार्यक्रमास प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, सहाय्यक आयुक्त खालापूर डॉ. रत्नाकर काळे, सहाय्यक आयुक्त अलिबाग डॉ. अजय कांबळे, ग्रीन वर्कस् ट्रस्टचे डॉ. निखिल भोपळे आणि जिल्ह्यातील सर्व सहायक आयुक्त व पशुधन विकास अधिकारी उपस्थित होते.**

### मृत जनावरांची मोफत वाहतूक

**आपल्या आजूबाजूला एखाद्या जनावराचा (गाय, बैल, म्हैस, घोडा, गाढव) मृत्यू झाल्यास कृपया ग्रीन वर्कस् ट्रस्टला ९०९६२९७०५९ व ८७७९४०९४६० या क्रमांकांवर संपर्क साधावा. जनवारांस विषबाधा किंवा जनावरचा मृत्यू प्लॅस्टिक खाऊन झालेला नाही याची दक्षता घ्या. मृत जनावरांची वाहतूक मोफत आहे. परिसर स्वच्छता तसेच पर्यावरण संवर्धनाच्या कामाला सहकार्य लाभावे, असे आवाहन ग्रीन वर्कस् ट्रस्टचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निखिल भोपळे यांनी केले आहे.**

> **गिधाड हे निसर्गातील सफाई कामगार आहेत. मृत जनावरे हे त्यांचे मुख्य खाद्य असल्याने अशा प्रकारचे मृत जनावर ते १० ते १५ मिनिटात खाऊन फस्त करतात. एखादे जनावर मृत झाल्याचे ग्रीन वर्कस् ट्रस्ट या संस्थेस कळवल्यास ते जनावराचा मृतदेह घेऊन व्हल्चर रेस्टॉरंटपर्यंत मोफत पोहोचवतात. अशाने घटनास्थळी असलेल्या नागरिकांची गैरसोय टाळता येईल व जनावर हे गावानजिक न पुरल्यामुळे रोगराई आळा बसेल.**
>
> **– डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड**

# समन्वयकाला ४० हजाराची लाच घेताना अटक

**खोपोली** : शिक्षकांचा तीन महिन्याचा थकीत पगार काढून देण्यासाठी ४० हजाराची लाच मागणाऱ्या रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या समन्वयकाला अटक करण्यात आली आहे. खालापूरात बुधवारी १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून ही कारवाई केली. पनवेल पंचायत समितीच्या अंतर्गत पनवेल तालुक्यातील प्राथमिक शाळा जाताडे येथे या शाळेतील उपशिक्षक तथा रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील समन्वयक अमित राजेश पंड्या ( वय वर्ष ४७ ) यांनी तक्रारदार तीन शिक्षकांकडून माहे जून, जुलै २०२४ या कालावधीचे वेतन काढून देण्यासाठी ४० हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती. तक्रारदार शिक्षकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला माहिती देत प्राथमिक शिक्षण विभागाच्या समन्वयका विरोधात तक्रार दाखल केली होती. दाखल तक्रारी नुसार पडताळणी करण्यात आली. पैसे स्विकारण्याची तारीख ४ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजताची पनवेल एस.टी.स्टॅन्ड येथे ठरली मात्र पंड्या यांना संशय आल्याने त्यांनी लाच स्विकारण्यास नकार दिल्याने सदरचा सापळा यशस्वी झाला नाही. तक्रारदार शिक्षकांनी पुन्हा विनंती करून पंड्या यांना आपले रखडलेले मानधन काढण्यासाठी विनंती केली असता त्यांनी पुन्हा लाच मागितली आणि ठिकाण खालापूर फाटा ठरला.

---

दि. १९/०९/२०२४

## :: जाहीर नोटीस ::

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रणिशा प्रकाश मांडवकर, प्रशांत प्रकाश मांडवकर, राकेश प्रकाश मांडवकर, अंकेश प्रकाश मांडवकर यांचेकडून सदर नोटीस नमुद मिळकतीपैकी क्षेत्र हे.आर.०-२०-०० एवढे क्षेत्राची मिळकत आमचे अशिल निलेश लक्ष्मण पाटील यांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| गांव | भुमापन क्रमांक | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|
| महाळूंगे बु., ता. मुरुड | २३/२/अ/१ | ०-६६-३० | १६-१८ |

वरील नमुद संपुर्ण मिळकतीपैकी क्षेत्र हे.आर. ०-२०-०० एवढ्या क्षेत्राची मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करुन घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यांत येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागावुन येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड. मोहीनेश मनोहर ठाकूर,**
बी. ए., एल.एल.बी.
रा. मु. चिंचघर, पो. बोर्ली - मांडला,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.
मोबा नं. ७०५७९०६८१८/८०८००१९११५

---

## टेंडर नोटीस/निविदा सुचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत माझे म्हणजेच अपर्णा कृष्णकांत पित्ती यांचे नावे आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७४ | १२ | ०-४४-०० | ०=२१ |

वर वर्णन केलेली मिळकत मला म्हणजेच अपर्णा कृष्णकांत पित्ती यांना विकावयाची आहे. त्याकरीता सदरील मिळकत विकत घेणाऱ्या व्यक्तींकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर निविदा दिनांक २४/०९/२०२४ रोजी पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकर यांचे नावाने बंद लिफाफ्यात सादर कराव्यात.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क खालील सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

दिनांक : १९/०९/२०२४

**अपर्णा कृष्णकांत पित्ती**
पत्ता. ब्लॉक नं. ६०१, सिल्वर लीफ अपार्टमेंट,
नारंगी बाग रोड, बोट क्लब, पुणे. ४०००११.
मो. ९८२३०२७१४७

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे - टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमांच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतींचे वर्णन :-**

**मौजे-टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्रीम. अरूणा जगदिश जोशी व इतर २ | १/७ | ०.२७.६० | १.७५ |

वरील प्रमाणे मिळकती त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मिळकतींचे मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील विद्यमान मालक श्रीम. अरूणा जगदिश जोशी व इतर २ यांचे मालकी हक्क, निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: १९/०९/२०२४

सही /-
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता-शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८ .
minakshibhase@gmail.com

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक दिलीप तुळशीदास वोरा रा.अ/४, पार्थ टाऊन, हाऊसिस विद्याविहार स्कूलच्या मागे, शुभनपूरा रोड, वडोदरा (बडोदा) गुजरात ३०९ ०२३ यांच्या सामाईक मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली वर्कस मिळकत माझे अशिलांचे नांवे आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नारंगी ता.अलिबाग | ७१ | ०-०६-०० | ०.१७ |

वर नमूद मिळकत ही माझे नांवे सहकब्जेदार म्हणून आहे. मला संबंधितांकडून त्रयस्थ इसम सदर मिळकतीचा व्यवहार करण्याच्या तयारीत आहेत असे खात्रीलायक समजले आहे. तरी सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की माझ्या अशिलांचे मिळकती संदर्भात कोणीही कोणताही व्यवहार करु नये व यानंतर अशाप्रकारे मिळकत विकत घेणारी व्यक्ती ''बोनाफाईड पर्चेसर फॉर व्हॅल्यु विदाऊट नोटीस'' असा बचाव घेवू शकणार नाहीत. तसा व्यवहार केल्यास तो माझ्यावर बंधनकारक राहणार नाही याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०९/२०२४

सही/-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग.

---

## जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सुचित करण्यात येते की माझे अशील **(१) श्री प्रमोद नरहरी म्हात्रे (२) श्री रवींद्र नरहरी म्हात्रे (३) श्री राजेंद्र नरहरी म्हात्रे (४) श्री सुबोध सुभाष नाईक (५) श्री सुधांशु सुभाष नाईक (६) श्रीमती विमल मोरेश्वर देसाई (७) श्री राजीव रमण भाटकर (८) श्रीमती सोनाली राजन जैन (९) श्रीमती रूपाली सबेस्टियन (१०) श्रीमती निर्मला विलास गोरेगावकर (११) श्रीमती सुनीला मोहन पाटील** यांच्याशी त्यांची मालमत्ता जी मौजे धोकावडे, तालुका आणि उपनोंदणी जिल्हा अलिबाग, जिल्हा रायगड आणि जिचे वर्णन सोबतच्या परिशिष्टात विस्ताराने करण्यात आले आहे तिच्या खरेदीच्या संदर्भात वाटाघाटी करत आहेत

अशा सर्व त्या व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेवर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, बिक्वेस्ट, लीज, सबलीज, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, लिव्ह अँड लायसन्स, को व्हीनंट, तारण, भार, ट्रस्ट, उत्तर अधिकार, कंत्राट, समझोता, इजमेंट, राईट ऑफ वे, व्यवसाय, ताबा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय खरेदी, एजमेंटरी हक्क आदींच्या माध्यमातून कोणत्याही स्वरूपाचा दावा, हक्क, हक्क संबंध आदी असल्यास त्यांनी त्या संदर्भातील सूचना लेखी स्वरूपात आपल्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे मेसर्स पूर्णानंद अँड कंपनी ॲडव्होकेट्स, फोर्ट ,चेंबर्स सी, दुसरा मजला, ६५ टेमरिंड लेन, फोर्ट मुंबई ४०० ०२३ आणि किंवा ई-मेलच्या माध्यमातून harshil.parekh@purnanand.co.in येथे ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसात सादर करावी अन्यथा आमचे अशील असे समजतील की या मालमत्तेच्या संदर्भात कोणताही दावा हक्क हक्क संबंध नाही आणि त्यानंतर प्राप्त झालेल्या दाव्यांचा विचार करण्यात येणार नाही आणि आमचे अशील अशा कोणत्याही हरकतींच्या अनुपस्थितीत व्यवहार पूर्ण करतील

**परिशिष्ट**
**मालमत्तेचे वर्णन**

भूखंड क्षेत्र एक हेक्टर ०३ हेअर ७० चौरस मीटर म्हणजेच १०,३७० चौरस मीटर सातबारा उताऱ्याप्रमाणे गट क्रमांक १११, जुना सर्वे क्रमांक १८२, मौजे धोकावडे, उप नोंदणी जिल्हा अलिबाग आणि जिल्हा रायगड उपनिबंधक अश्योरन्स, अलीबाग यांच्या हद्दीत आणि ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे नोंद करण्यात आल्यानुसार आहेत पूर्व दिशेला किंवा त्या बाजूने : गावचा रस्ता, पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूने: गट क्रमांक ५६ मौजे धोकावडे, उत्तर दिशेला किंवा त्या बाजूने : गट क्रमांक ११०, ११२ आणि ११३ मौजे धोकावडे. दक्षिण दिशेला किंवा त्या बाजूने : गावचा रस्ता

**दिनांक २० सप्टेंबर २०२४**
**पूर्णानंद अँड कंपनी यांच्याकरिता**
**भागीदार**

**पूर्णानंद अँड कंपनी**
**एडवोकेट अँड सॉलीसिटर्स**
फोर्ट चेंबर्स, सी विंग, दुसरा मजला,
६५ टेमरिंड लेन, फोर्ट मुंबई ४०० ०२३
harshil.parekh@purnanand.co.in

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गाणतर्फे परहूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालक बिमलादेवी जनार्दन अगरवाल यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| गाणतर्फे परहूर | ६/५/ब/७ | ०-२२-३६ | ०.३९ |
| गाणतर्फे परहूर | ४/२ | ०-८६-६० | ०६.९१ |
| | पो. ख. | ०-०५-९० | |
| | | ०-९२-५० | |

पैकी ० हे. ८ आर एवढी मिळकत.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २०/९/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

दिनांक : २० सप्टेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.- पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| दिनकर देवराम अत्तरंदे<br>शारदा किशोर खाचणे | ६७ | १/ ग | ०-७०-००<br>०-७०-०० | २<br>२ | ३०<br>३० |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २०/०९/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

---

## जाहिर नोटीस

काटकर ए. एम
वादी तर्फे वकील

**पेण येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. १०७/२०१६

सुनिता जनार्दन घरत
पूर्वाश्रमीची सुनिता हाशा म्हात्रे — वादी

विरुध्द

१. विठोबा हाशा म्हात्रे मयत तर्फे वारस वगैरे
१३. कविता विजय अहिर
रा. फ्लॅट नं. १२०५-१२०६, बारावा मजला, — प्रतिवादी
बी विंग, निळकंट हाईट, रामेश्वर बिल्डींग
पोखरण रोड नं. २, देवदयानगर जवळ, ठाणे (पश्चिम)

या जाहीर नोटीसीने प्रतिवादी नं. १३ कविता विजय अहिर यांना कळविण्यात येते की, वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता व स्वतंत्र ताबा निर्तुटक करुन मिळण्यासाठी, रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ३३/१९९२ चा हुकूमनामा रद्द करुन मिळण्यासाठी व दिनांक ७-३-२००७, दिनांक ३०-१०-२०१० व दिनांक २६-४-२०११ व दिनांक १५-११-२०१७ रोजीचे परंतु दिनांक ११-१२-२०१७ रोजी नोंदविलेली खरेदीखते वादींवर बंधनकारक नाहीत असे ठरवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

प्रतिवादी नं.१३ कविता विजय अहिर यांनी दिनांक ३०-१०-२०१० रोजीच्या खरेदीखतात जो पत्ता नमूद केला आहे. तोच पत्ता वादी यांनी दाव्यात नमूद केला आहे.

प्रतिवादी नं. १३ कविता विजय अहिर यांनी प्रतिवादी नं. १६ व १७ यांचे लाभांत दिनांक १५-११-२०१७ रोजी केलेल्या तथाकथित खरेदीखतात प्रतिवादी नं. १३ कविता विजय अहिर यांनी जो पत्ता दिला आहे तोच पत्ता वादी यांनी दाव्यात नमूद केला आहे.

प्रतिवादी नं. १३ यांना सदरच्या दाव्याचे वारंवार समन्स काढूनही त्या समन्सची बजावणी करुन घेत नाहीत व समन्स घेण्याचे टाळाटाळ करीत आहेत. सबब प्रतिवादी नं. १३ यांच्या राहत्या घरावर दाव्याचे समन्स डकवून बजावण्यासाठी वादी यांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला. सदरच्या अर्जाप्रमाणे निशाणी नं.१२२ कडे बेलिफचा रिपोर्ट आलेला आहे. सदरच्या रिपोर्टमध्ये बेलिफ यांनी असे नमूद केले आहे की, प्रतिवादी नं. १३ यांनी सदरच्या घराची विक्री केल्यामुळे आता त्या घरात नवीन व्यक्ती राहत आहे. त्यामुळे बेलिफने सदरचे समन्सची बजावणी न करता परत पाठवले आहे असे बेलिफ रिपोर्ट वरुन समजते. सबब प्रतिवादी नं. १३ कविता विजय अहिर यांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर तुम्ही नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत पेण येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दिनांक २५/१०/२०२४ रोजी सकाळी १०-३० वाजता हजर राहावे व आपली कैफियत मांडावी. अन्यथा तुम्हास सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी आपल्या विरुध्द एकतर्फी घेऊन निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०९/२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केली आहे.

(गोल शिक्का)

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन पेण**

सही/-
**अधिक्षक**
**सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन पेण**

---

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड
## जाहीर नोटीस

दि. १९/०९/२०२४
जा.क्र. / २०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | १६३२/११ | शिवसदन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६०५ चौ.फुट सदनिका | वैशाली राजेश चव्हाण | नरेंद्र हसू म्हात्रे, वनिता नरेंद्र म्हात्रे |
| २ | ६ | ७३१/२/६ | गंगोत्री सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट सदनिका | अपर्णा किशोर तळगावंकर | अश्विनी सचिन देशपांडे, |
| ३ | ४ | १८२५/१२ | सि शेल सोसायटी डि विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला ५२२ चौ.फुट सदनिका | श्रीजी एन्टरप्रायझेस पार्टनर तर्फे विजयकुमार जयंतभाई वसोया | विक्रम दिलीप पवार, पुजा विक्रम पवार |
| ४ | ६ | ६९५/१ | पाटीलवाडी चेंढरे | पक्के सिमेंट बांधकाम घर | विजय दिगंबर यादव | सौ. सुप्रिया सनि माजगांवकर |
| ५ | ४ | १२६३/५ | ज्वेल्स ऑफ अलिबाग | आर.सी.सी.पक्के सिमेंट १ ला मजला ५२५ चौ.फुट | सोनल रमेश नाईक | सोनल रोनक वोरा |
| ६ | ४ | ३९८ | सदगुरू हौ.सोसा. विद्यानगर पुर्व | आर.सी.सी.पक्के सिमेंट घर १०५६ चौ.फुट | भारती मनोहर वेगुर्लेकर | अमित विजय वेगुर्लेकर, समिर विजय वेगुर्लेकर |
| ७ | ५ | ११६१ | गोंधळपाडा चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १२०० चौ.फुट | संजय सदाशिव टेमघरे | सुषमा अविनाश पाटील |
| ८ | ५ | १६२०/३ | स्वामी शक्ती सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला ५९६ चौ.फुट | विशाखा प्रशांत पाटील, प्रशांत अनंत पाटील | ऋग्वेद संदिप कवळे |
| ९ | ३ | १६७३/९ | प्रमिला हौ.सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ ला मजला चौ.फुट | विजय रामचंद्र कोसवे | विणा विजय कोसवे |
| १० | ६ | १९५८/२ | नवअलिबाग रस्ता | पक्के सिमेंट बांधकाम घर | प्रसन्न कुमार जयराम पाटील | प्रतिमा प्रसन्नकुमार पाटील |
| ११ | ४ | १५४९/४ | स्वानंद सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ९८५ चौ.फुट | सरोज श्रीकांत रानडे | यशवंत रामचंद्र दळवी |

**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**सौ. स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हेमंत महादेव नाईक, श्री. भालचंद्र महादेव नाईक, श्रीमती दर्शना दत्तत्रेय नाईक, जान्हवी अमित म्हात्रे, संगिता गजानन नाईक, प्रशांत गजानन नाईक, परेश गजानन नाईक, प्रितम राजेश पटेल, प्रतिभा विलास पाष्टे, सुनंदा रघुनाथ बुरांडे, विनोदिनी विजय नाईक, इंदुमती दत्ताराम वर्तक सर्व रा. चौल गोळवादेवी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असून त्यांचा असणारा ७/८ अविभक्त हिस्सा त्याचे अंदाजे क्षेत्र ०-१९-९५ हे. आर. इतके असून ते क्षेत्र सदर मिळकतीचे लगत कब्जेदार माझे स्नेही श्री. हरिश्चंद्र चिंतामण पाटील रा. चौल सोंडेपार, पो.चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल | २३४९ | | ०-२१-७० | ३.८९ |
| ता.अलिबाग | | पो.ख. | ०-०१-१० | |
| | | एकूण | ०-२२-८० | |

वर नमूद मिळकतीपैकी विद्यमान मालक श्री. हेमंत महादेव नाईक, श्री. भालचंद्र महादेव नाईक, श्रीमती दर्शना दत्तत्रेय नाईक, जान्हवी अमित म्हात्रे, संगिता गजानन नाईक, प्रशांत गजानन नाईक, परेश गजानन नाईक, प्रितम राजेश पटेल, प्रतिभा विलास पाष्टे, सुनंदा रघुनाथ बुरांडे, विनोदिनी विजय नाईक, इंदुमती दत्ताराम वर्तक सर्व रा. चौल गोळबादेवी, पो. चौल, ता.अलिबाग, जि. रायगड यांचा असणारा ७/८ अविभक्त हिस्सा अंदाजे अविभक्त हिस्सा त्याचे अंदाजे क्षेत्र ०-१९-९५ हे. आर. या क्षेत्राबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०९/२०२४

सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा.थेरोंडा (धाकलीवाडी),
पो. चौल ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - मिरचोली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अंकुश रघुनाथ घोडविंदे | २८ | १ | ०-०२-२२ | ०-०२ |
| अंकुश रघुनाथ घोडविंदे | २८ | २ | ०-१९-३२ | ०-१६ |

सदरच्या जमीन मिळकती हया वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्‌भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २०/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि.रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे अंजप तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| अंकुश रघुनाथ घोडविंदे | ८३ | ३ | १-११-०० | १-१० |
| अंकुश रघुनाथ घोडविंदे | ८३ | ६ | ०-३८-०० | ०-३५ |

सदरच्या जमीन मिळकती हया वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्‌भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २०/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

निवडक

## जडेजाची बॅट तळपली

**चेन्नई :** भारतीय क्रिकेट संघ दीड महिन्याच्या विश्रांतीनंतर गुरुवारी मैदानात उतरला. गुरुवारपासून भारताचा बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिकेतील पहिला सामना चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर सुरू झाला आहे. या सामन्याचा पहिला दिवस भारताकडून आर अश्विन आणि रविंद्र जडेजाने, तर बांगलादेशकडून हसन मेहमुदने गाजवला. अश्विन शतक करून नाबाद आहे, तर जडेजानेही नाबाद अर्धशतक झळकावले आहे. जडेजानेही ७३ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण करून ८६ धावांवर नाबाद राहिला.

## आश्विनची शतकी खेळी

**चेन्नई :** भारत विरुद्ध बांगलादेश संघातील कसोटी मालिकेतील पहिल्या दिवशी लोकल बॉय अश्विनने त्याच्या फलंदाजीने बांगलादेशच्या गोलंदाजांना चांगलेच सतावले. अश्विनने या सामन्यात शतकी खेळी केली. बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्या गोलंदाजांनी सुरूवातही चांगली केली. विराट, रोहित सारख्या दिग्गजांनाही गंडवलं. पण यानंतर आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांची जोडी जमली. या दोघांनी एकमेकांची शानदार साथ देताना दीडशतकी भागीदारी केली.

## जैस्वालचे 'यशस्वी' अर्धशतक

**चेन्नई :** भारताची आघाडीची फळी अपयशी ठरल्यानंतर यशस्वी जैस्वाल आणि ऋषभ पंत यांनी बांगलादेशच्या गोलंदाजांची धुलाई केली. यावेळी यशस्वीने अर्धशतक पूर्ण केले. भारताने ३४ धावांत ३ बळी गमावले होते. यावेळी जैस्वाल व पंत यांनी चौथ्या बळीसाठी अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली आहे. ऋषभ व यशस्वी यांची जोडी तोडण्यासाठी बांगलादेशकडून रडिचा डाव सुरू झाला. पहिल्या दिवसाच्या लंच ब्रेकपर्यंत दोघांनी ५४ धावांची भागीदारी करून संघाला ३ बाद ८८ धावांपर्यंत पोहोचवले होते.

## 'तेंडुलकर पिचवरून चिपमध्ये'

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी राज्यातील पहिल्या सेमीकंडक्टर उत्पादन युनिटचे उद्घाटन केले. नवी मुंबईतील या युनिटमुळे भारताची परदेशी सेमीकंडक्टर चिपवरची अवलंबित्व कमी होईल. याकंपनीत सचिन तेंडुलकरचा सहभाग असून तो कंपनीत एक गुंतवणूकदार आहे. यात १२,०३५ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. एकनाथ शिंदेंनी म्हटले की, सचिन तेंडुलकर क्रिकेटचा देव आहे, पण जेव्हा तो पिचवरून चिपमध्ये पोहोचला, तेव्हा आम्हाला कळलेच नाही. पिचवर अंपायर असतो, पण चिपला कंडक्टर लागतो.

## आयुबचा प्रयत्न फसला

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताच्या सूर्यकुमार यादवने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटच्या षटकात डेव्हिड मिलरचा बाऊंड्री लाईन जवळ अफलातून झेल घेतला होता. त्याने स्वत:वर नियंत्रण ठेवत हा झेल घेतला होता. आता त्याच्याच झेल सारखा झेल घेण्याचा प्रयत्न पाकिस्तानच्या साईम आयुबनेही केला, पण त्याचा हा प्रयत्न फसला. सध्या पाकिस्तानमध्ये देशांतर्गत स्पर्धा चॅम्पियन्स एकदिवसीय चषक स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत आयुब पँथर्स पाकिस्तान संघाचे प्रतिनिधित्व करत आहे.

# आयपीएलचा मेगा लिलाव भारताबाहेर?

### ▶ नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये आयोजन ▶ नवीन रिटेन्शन नियम जारी करणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२५ पूर्वी मेगा लिलावाचे आयोजन होणार आहे. आता या संदर्भात एक महत्त्वाची माहिती समोर येत आहे. यावेळी मेगा लिलाव नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केला जाण्याची शक्यता आहे. अहवालानुसार भारतीय क्रिकेट नियामक मंडळ लवकरच याबाबत माहिती देण्याची शक्यता आहे. मेगा लिलावापूर्वी खेळाडूंची सुटका (रिलीज) आणि कायम ठेवण्याची (रिटेन्शन) यादीही जाहीर करण्यात येणार आहे. तसेच, बीसीसीआय नवीन रिटेन्शन नियमही जारी करणार आहे.



बीसीसीआय सध्या मेगा लिलावाची तयारी करत आहे. हा लिलाव नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केला जाऊ शकते. नवीन रिटेन्शन नियमही या महिन्याच्या शेवटी जाहीर केले जाऊ शकतात. याआधी आयपीएलचा पहिला मेगा लिलाव २०१४ मध्ये झाला होता. तर, दुसरा मेगा लिलाव २०१८ मध्ये झाला होता. आत्तापर्यंत गेल्या १० वर्षांत आयपीएलमध्ये फक्त दोनच मेगा लिलाव झाले असून आता पुन्हा एकदा २०२५ मध्ये मेगा लिललावाची तयारी सुरू झाली आहे.

आयपीएलसाठीचा मेगा लिलाव कोठे आयोजित केला जाईल, याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. परंतु, मिळालेल्या माहितीनुसार गेल्यावेळेप्रमाणेच या वेळीही परदेशात लिलाव आयोजित केला जाण्याचीशक्यता आहे. आयपीएल २०२४ मधील लिलाव दुबईमध्ये आयोजित करण्यात आला होता. तर २०२३ मध्ये भारतातच लिलाव आयोजित करण्यात आला होता. मात्र, यावेळी पुन्हा हा कार्यक्रम परदेशात आयोजित केला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, आययपीएल मेगा लिलावापूर्वी रिटेन्शन नियम देखील जाहीर केले जाणार आहेत. हा नियम कोणता संघ किती खेळाडूंना कायम ठेवू शकेल यावर अवलंबून असेल. अशा परिस्थितीत अनेक मोठ्या खेळाडूंचे संघ बदलतील.

तसेच, रोहित शर्मा, रिषभ पंत, सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह यांच्याबाबत अनेक अफवा पसरल्या आहेत. गेल्या मोसमात मुंबईने रोहितला कर्णधारपदावरून हटवले होते. त्याच्या जागी हार्दिक पांड्याकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. यामुळे रोहितचे चाहतेही संतापले होते. अश्या स्थितीत आगामी हंगामासाठी संघ काय निर्णय घेतील, हे पाहणे रंजक ठरणार आहे.

# अफगाणिस्तान संघाचा भीम पराक्रम

### दक्षिण आफ्रिकेवर पहिल्यांदाच मात

**। नोएडा । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान संघाने एकदिवसाय क्रिकेटमध्ये प्रथमच द. आफ्रिकेवर विजय मिळवण्याचा भीम पराक्रम केला आहे. यावेळी द. आफ्रिकेचा संपूर्ण संघ १०६ धावांवर तंबूत पाठवल्यानंतर अफगाणिस्तानने २६ षटकांत सहा गडी राखून विजयाची नोंद केली आहे.



द. आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. रिझा हेंड्रिक्स (९), टॉनी डी जॉर्जी (११), कर्णधार एडन मार्करम (२), त्रिस्तान स्तब्स (०), कायले वेरेयने (१०) आणि जेसन स्मिथ (०) यांना माघारी पाठवून आफ्रिकेची अवस्था ७ बाद ३६ अशी केली होती. एँडील फेहलुकवायो शून्यावर धाव बाद झाला. वियान मुल्डर व बीजॉर्न फॉर्टूइन या दोघांनी ४० धावा जोडल्या. यावेळी मुल्डरने ८४ चेंडूंत ५ चौकार व १ षटकारासह ५२ धावा केल्या. आफ्रिकेचा डाव ३३.३ षटकांत १०६ धावांवरच आटोपला. अफगाणीस्तानच्या फारुकीने ४, घाझनफरने ३ आणि राशिदने २ बळी घेतले.

अफ्रिकेने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा रहमनुल्लाह गुरबाज भोपळ्यावर माघारी परतला. रहमत शाहही ८ धावाच करू शकला. अफगाणिस्तानने ४ फलंदाज ६० धावांवर गमावले. पण, अझमतुल्लाह ओमारजाई (२५) व गुलबदीन नइब (३४) यांच्या नाबाद खेळीने संघाला ६ गडी राखून विजय मिळवून दिला. अफ्रिकेच्या बी जॉर्न फॉर्च्युनने दोन बळी घेतले.



# गांगुलीची सायबर सेलमध्ये धाव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने बुधवारी सायबर सेलमध्ये एका यूट्यूबरविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. यूट्यूब व्हिडिओद्वारे त्याचा अपमान केल्याबद्दल गांगुलीने सायबर पोलिसांकडे तक्रार केली आहे.

बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुलीने सिनेबॅप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मृण्मय दास नावाच्या बंगाली यूट्यूबरविरुद्ध अब्रुनुकसानीची तक्रार दाखल केली आहे. यूट्यूबरने त्याच्याविरुद्ध अश्लील आणि अपशब्द वापरल्याचे तक्रारीमध्ये नमूद केले आहे. गांगुलीचा सचिव तान्या चॅटर्जी याने कोलकाता सायबर सेलला लेखी तक्रार दिली आहे. या तक्रारीत त्याने यूट्यूबरचे चॅनल आणि नाव देखील नमूद केले आहे. त्याने सायबर सेलला एक ईमेल पाठवला, ज्यामध्ये एका व्हिडिओची लिंकही शेअर केली आहे. ईमेलबाबत सायबर अधिकाऱ्याने सांगितले की, आम्हाला ईमेल आला असून आम्ही त्याची चौकशी करत आहोत.

गांगुलीच्या सचिवाने ईमेलमध्ये लिहिले की, मी या ईमेलद्वारे मृण्मय दास नावाच्या व्यक्तीची तक्रार करत आहे. हे सायबर बुलिंग आणि बदनामीचे प्रकरण असून या व्यक्तीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यामध्ये सौरव गांगुलीला लक्ष्य करत अपशब्द वापरण्यात आले आहेत. त्याच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी करत आहे, जी त्याच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवते.

# भारताची चीनला कडवी टक्कर

### गुकेशने तब्बल सहा तास झुंजवले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय खेळाडूंनी चेस ऑलिम्पियाड स्पर्धेत दमदार कामगिरी करताना सलग सातव्या फेरीत विजय मिळवला आहे. भारतीय खेळाडूंनी खुल्या गटात चीनला कडवी टक्कर दिली. हा सामना १.५-१.५ असा निर्णायक वळणावर असताना जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या गुकेशने सहा तास चीनच्या खेळाडूला झुंजवले. गुकेशने सहा तास चाललेल्या लढतीत चीनच्या वेई यी याच्यावर विजय मिळवून भारताचा २.५-१.५ असा विजय निश्चित केला. ८०व्या चालीत गुकेशने चिनी खेळाडूला हार मानण्यास भाग पाडले.



जागतिक अजिंक्यपद स्पर्धा यातील विजेत्या डिंग लिरेन याने गुकेशसोबतची लढत टाळली होती. यामुळे वेई सातव्या फेरीत भारतीय खेळाडूविरुद्ध खेळला. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत गुकेश विरुद्ध डिंग असा सामना रंगणार आहे. गुकेशने विजय मिळवण्यापूर्वी यांगई यू विरुद्ध प्रज्ञानंदा, अर्जुन एरिगैसी विरुद्ध बू झिंगझी आणि वांग यूई विरुद्ध पी हरिकृष्णा या लढतीत बरोबरीत सुटल्याने दोन्ही संघांचे १.५-१.५ असे गुण झाले होते. यामुळे गुकेश व वेई यांच्या लढतीकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या.

## हार्दिक पांड्याची घसरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकानंतर हार्दिक पांड्याला कर्णधारपद मिळेल अशी अपेक्षा होती. पण, आगरकरच्या निवड समितीने सूर्यकुमार यादवकडे टी-२० संघाचे नेतृत्व सोपवण्याचा निर्णय घेतला. या धक्क्यातून सावरत हार्दिक बांगलादेशविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेसाठी कसून मेहनत घेताना दिसत आहे. हार्दिकने सरावाचे काही फोटो त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. परंतु, आयसीसीने एक ट्विट करून त्याला धक्का दिला आहे. हार्दिक पांड्याची आगामी बांगलादेश मालिकेपूर्वी आयसीसी टी-२० अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत घसरण झाली आहे. सहाव्या क्रमांकावर असलेला पांड्या आता एकूण १९९ रेटिंग गुणांसह सातव्या स्थानावर घसरला आहे.

# समरवीरावर वीस वर्षांची बंदी

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

श्रीलंकेचा माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू दुलीप समरवीरा याच्यावर क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून २० वर्षांची बंदी घातली गेली आहे. त्याला आता क्रिकेट ऑस्ट्रेलिया, राज्य संघटना, बीबीएल किंवा डब्लबीबीएल क्लबमध्ये कोणत्याही पदावर राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. समरवीराने क्रिकेट व्हिक्टोरिया कर्मचारी असताना त्याच्या काळात सीएच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचे आढळून आले आणि त्याच्या आचारसंहिता आयोगाने त्याच्यावर २० वर्षांची बंदी घातली होती.



१९९३ ते १९९५ दरम्यान श्रीलंकेसाठी सात कसोटी आणि पाच एकदिवसीय सामने खेळणारा समरवीरा हा व्हिक्टोरिया महिला आणि मेलबर्न स्टार्स या डब्लूबीबीएलमधील संघांचा सहाय्यक प्रशिक्षक होता. या वर्षाच्या सुरुवातीला त्याची व्हिक्टोरिया महिलांच्या वरिष्ठ प्रशिक्षकपदी पदोन्नती झाली होती. परंतु, त्याने दोन आठवड्यांनंतर राजीनामा दिला. राज्याच्या धोरणांमुळे त्याला त्याच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती नाकारण्यात आली होती. सीएच्या आयोगाला समरवीराने आचारसंहितेचे उल्लंघन करणारे अनुचित वर्तन आढळले. त्याने महिला खेळाडूसोबत चुकीची वागणुक केल्याचा आरोप आहे. क्रिकेट व्हिक्टोरियाचे सीईओ निक कमिन्स यांनी समरवीराच्या वर्तनाचा निषेध करणारे निवेदन जारी केले आहे.

# पॉंटिंग बनला पंजाबचा प्रशिक्षक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लवकरच इंडियन प्रीमियर लीग २०२५ ला सुरुवात होणार आहे. अशामध्ये प्रत्येक फ्रेंचायझीने आपल्या संघात बदल करण्यास सुरुवात केली आहे. आगामी आयपीएलसाठी पंजाब किंग्सने ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंगची नवे मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड केली आहे. यापूर्वी तो दिल्ली कॅपिटल्स संघाचा प्रशिक्षक होता. त्याच्या प्रशिक्षणाखाली संघाने चांगली प्रगती केली होती. यानंतर नुकतेच त्याने दिल्ली कॅपिटल्सचे प्रशिक्षकपद सोडले. यानंतर आता प्रीती झिंटाच्या पंजाब किंग्सने त्यांच्या संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड केली आहे.




रिकी पॉंटिंग हा ऑस्ट्रेलिया संघाचा एक यशस्वी कर्णधार होता. त्याच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियाने सलग तीनदा आयसीसी विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद जिंकले होते. त्यानंतर त्याने सलग सात वर्ष दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. दिल्लीचा संघ या सात वर्षात जेतेपदाला गवसणी घालू शकला नसला तरीही त्याच्या प्रशिक्षणाखाली अनेक तरुण खेळाडू उदयास आले. याआधी त्याने मुंबई इंडियन्सचा प्रशिक्षक म्हणून काम पाहिले होते. तेव्हा मुंबई इंडियन्सने २०१५ मध्ये आयपीएलचे जेतेपद पटकावले होते.

## अय्यरला कसोटी संघातून वगळले

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशविरुद्ध चेन्नई येथे होत असलेल्या मालिकेतील पहिल्या कसोटीसाठी श्रेयस अय्यरची भारतीय संघात निवड झालेली नाही. सध्या अय्यर दुलीप ट्रॉफीमध्ये भारत 'ड'चे नेतृत्व करत आहे. परंतु, दुलीप ट्रॉफीमध्ये अय्यरच्या बॅटमधून विशेष काही दिसले नाही. यातच आता बीसीसीआयचा नवा आदेश समोर आला आहे. ज्यामध्ये अय्यरला सध्या भारतीय कसोटी संघात स्थान नसल्याचे सांगण्यात आले आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, सध्या श्रेयसला कसोटी संघात स्थान नाही. तो कोणाची जागा घेणार? याशिवाय दुलीप ट्रॉफीमध्ये त्याच्या शॉटची निवड हा चिंतेचा विषय ठरला आहे. तो सेट झाला होता आणि मग अचानक त्याने हा शॉट खेळला. जेव्हा तुम्ही सेट आणि सपाट ट्रॅकवर फलंदाजी करत असता तेव्हा तुम्हाला त्या संधीचा उपयोग करणे आवश्यक असते.




# पाकिस्तान संघाचा दुहेरी पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान नेहमी भारताची बरोबरी करायला जातो आणि स्पर्धा करण्याच्या नादात अनेकदा तोंडावर आपोटतो. असाच प्रकार चीनमध्ये नुकत्याच पार पडलेल्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेतही पाहायला मिळाला. भारताकडून दारूणपराभवपत्करावा लागल्यानंतर पाकिस्तानी खेळाडूंच्या हाती चीनचा झेंडा पाहायला मिळाला. यावेळी भारत-चीन लढतीत पाकिस्तानी खेळाडू चीनला सपोर्ट करत होते. पण, भारताने विजय मिळवून पाकिस्तानचा तिथेही पोपट केला. आणि आता तर पाकिस्तान हॉकी महासंघाने कमी मानधन जाहीर करून खेळाडूंची थट्टाच केली आहे.




पाकिस्तानने कांस्यपदकाच्या लढतीत कोरियावर विजय मिळवला. उपांत्य फेरीत यजमान चीनकडून पेनल्टी शूट आऊटमध्ये पराभूत झालेल्या पाकिस्तान संघाने तिसऱ्या क्रमांकासाठीची लढत जिंकली. माजी विजेत्या पाकिस्तानने दक्षिण कोरियावर ५-२ असा दणदणीत विजय मिळवला. पाकिस्तानच्या शाहिद हनन व सुफियान खान यांनी प्रत्येकी दोन गोल केले, तर रुमानने एक गोल केला. कोरियाकडून ली जुंगजून व यांग जिहून यांनी प्रत्येकी एक गोल केला. पाकिस्तानने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीत कांस्यपदक जिंकल्यानंतर पाकिस्तानी हॉकी फेडरेशनने खेळाडूंना १०० डॉलर बक्षीस म्हणून जाहीर केले. भारतीय रुपयात ही रक्कम ८ हजार ४०० इतकी होते.

### ऑलिम्पिक विजेती जॉर्जियाचा पराभव


# नागपूरच्या मुलीचा चीनमध्ये डंका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नागपूरच्या २२ वर्षीय मालविका बनसोड हिने चीन ओपन बॅडमिंटन स्पर्धेत बुधवारी (दि.१८) धक्कादायक निकाल नोंदवला आहे. मालविकाने पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती आणि जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या जॉर्जिया तुंजंगचा २६-२४, २१-१९ असा धक्कादायक पराभव केला आहे. तसेच, मालविकाचा हा कारकीर्दितील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय ठरलेला आहे.

मालविका बनसोडेने मालदिव व नेपाळ आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकलेल्या आहेत. शिवाय तिने राष्ट्रीयस्तरावरील अनेक ज्युनियर व सीनियर स्पर्धेत सुवर्णपदकं जिंकली आहेत. वयाच्या आठव्या वर्षी तिने बॅडमिंटन खेळण्यास सुरुवात केली होती. तिने १३ वर्षांखालील व १७ वर्षांखालील राज्यस्तरीय स्पर्धेचे जेतेपद पटकावले आहे. २०१८ मध्ये तिला आशियाई ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेची पात्रता मिळवण्यात अपयशी झाल्यानंतर तिने सलग दोन निवड चाचणी स्पर्धा जिंकल्या आणि जागतिक ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेची पात्रता मिळवली होती.

डिसेंबर २०१८ मध्ये मालविकाने दक्षिण आशिया विभागातील २१ वर्षांखालील स्पर्धेत जेतेपद पटकावले होते. वैयक्तिक व सांघिक अशी दोन्ही जेतेपदं तिने या स्पर्धेत आपल्या नावावर केली होती. २०१९ मध्ये तिने ऑल इंडिया सीनियर रँकिंग आणि ऑल इंडिया ज्युनियररँकिंगस्पर्धाजिंकली. त्याचवर्षी तिने बल्गेरियन ज्युनियर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते. तसेच, २०२२ मध्ये इंडिया ओपन स्पर्धेत तिने सायना नेहवालला पराभूत करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता. यावेळी सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पीव्ही सिंधूने तिला पराभूत करून जेतेपद पटकावले होते.



# 'निवृत्तीची घोषणा म्हणजे विनोदच'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या कसोटी आणि एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. २०२४ टी-२० विश्वचषक विजेतेपद भारताला जिंकून दिल्यानंतर रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला होता. यानंतर रोहितने श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत टी-२० प्रमाणे फलंदाजी केली. त्यानंतर चर्चा सुरू झाली की, कदाचित रोहित टी-२० मधून निवृत्ती माघारी घेईल. पण आता त्याने निवृत्तीवर मजेशीर उत्तर दिले आहे.

रोहित शर्मा म्हणाला की, आजकाल जागतिक क्रिकेटमध्ये निवृत्ती हा विनोद बनला आहे.



- **बाहेरच्या देशात घोषणा करतात आणि पुन्हा खेळायला येतात**
- **टी-२० फॉरमॅट आवडत असून आयपीएल खेळतच राहणार**

लोक निवृत्तीची घोषणा करतात, पण नंतर पुन्हा खेळायला येतात. भारतात असे घडले नाही. मात्र, इतर देश त्यांच्या निवृत्तीची घोषणा करतात. परंतु, नंतर यू-टर्न घेतात. जेणेकरून कोणीतरी खरोखर निवृत्त झाले आहे की नाही हे तुम्हाला कधीच कळणार नाही. तो पुढे म्हणतो की, माझा निर्णय अंतिम आहे आणि मी अगदी स्पष्ट आहे. टी-२० इंटरनॅशनलला अलविदा करण्याची हीच योग्य वेळ होती. मी माझी निवृत्ती परत घेणार नाही. तसेच, टी-२० फॉरमॅट खेळायला खूप आवडते असेही तो म्हणाला.असे असले तरी रोहीत शर्मा आयपीएलमध्ये खेळत राहणार आहे. रोहित शर्माने जर मुंबई इंडियन्सपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला असेल तर तो आगामी हंगामात इतर काही संघात खेळताना दिसू शकतो.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)